# मी माझ्या तारणाची खातरजमा करू शकतो का?

निर्णायक प्रश्न मालिका

आर. सी. स्प्रॉल

मी माझ्या तारणाची खातरजमा
करू शकतो का?

# मी माझ्या
# तारणाची
# खातरजमा
# करू शकतो का?

आर. सी. स्प्रॉल

CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 4 06-08-2025 23:20:04

Can I Be Sure I'm Saved?
© 2010 by R.C Sproul
Published by Ligonier Ministries
421 Ligonier Court, Sanford, FL 32771
Ligonier.org

First Marathi Translation and Print 2025
Translated and Published by
Soli Deo Gloria Publishing

मराठी भाषांतर व मुद्रण 2025
**सोली डियो ग्लोरिया पब्लिशिंगद्वारे अनुवादित व प्रकाशित**

# अनुक्रमणिका


**प्रकरण -1** खातरजमासाठीचा संघर्ष ........................1

**प्रकरण -2** चार प्रकारचे लोक ............................17

**प्रकरण -3** खोटी खातरी ...............................27

**प्रकरण -4** तारणाची खातरजमा करणे .....................39

**प्रकरण -5** तारणाच्या पूर्ण खातरीचे उगमस्थान ...............55

## प्रकरण 1

# खातरजमासाठीचा संघर्ष

नवीन करारात एक शास्त्रपाठ आहे, जो मला बायबलमधील सर्वात धडकी भरवणारा वाटतो. त्या शास्त्रपाठातील शब्द डोंगरावरील उपदेशाच्या शेवटी येशूच्या मुखातून आले आहे.

आपण स्वभावत: डोंगरावरील उपदेशाकडे प्रभु येशूने दिलेल्या एका सकारात्मक प्रेरणादायी घोषणे प्रमाणे पाहतो; कारण याच डोंगरावरील उपदेशात त्याने धन्य वचने दिली आहेत : “जे आत्म्याने ‘दीन’ ते धन्य... ‘जे शोक करीत आहेत’..., ते धन्य, ‘जे सौम्य’ ते धन्य... ” व पुढे बरेच काही आपण वाचतो (मत्तय 5:3–12).



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 1 06-08-2025 23:20:04

डोंगरावरील उपदेशामुळे येशूला सहसा नकारात्मकतेपेक्षा सकारात्मकतेवर भर देणारा एक धर्मोपदेशक म्हणून ख्याती प्राप्त झाली आहे.

पण आपण अनेकदा त्या उपदेशाच्या अत्यंत महत्त्वाच्या सारभूत शिखराकडे दुर्लक्ष करतो, जिथे येशू म्हणतो.

> “मला ‘प्रभूजी, प्रभूजी’ असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, ‘प्रभो, प्रभो, आम्ही तुझ्या नावाने संदेश दिला, तुझ्या नावाने भुते घालवली व तुझ्या नावाने पुष्कळ महत्कृत्ये केली नाहीत काय?’ तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगेन की, ‘मला तुमची कधीच ओळख नव्हती; अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा.’” (मत्तय 7:21-23)

येथे येशू अंतिम न्यायाचे एक गंभीर आणि स्पष्ट दर्शन आपल्या पुढे उभे करतो. तो म्हणतो की अनेक लोक त्याच्याकडे येतील आणि त्याला “प्रभूजी” या शीर्षकाने संबोधतील. ते येशूला म्हणतील: “प्रभु”, आम्ही पुष्कळ अदभूत कृत्ये तुझ्या नावाने केलीत आम्ही तुझी सेवा केली; आम्ही तुझ्या नावाने उपदेश दिला; आम्ही भुते घालवली; आम्ही या सर्व गोष्टी तुझ्याच नावाने केल्यात.” येशू म्हणतो, “मी या लोकांकडे वळेन व म्हणेल , “माझ्यापासून दूर व्हा.” तो एवढेच म्हणणार नाही, ‘मला तुमची ओळख नव्हती” तर तो असे म्हणेल “तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगेन की, ‘मला तुमची कधीच ओळख नव्हती; अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा.”

सावधगिरीच्या या भयानक चेतावणीबद्दल विशेषतः मार्मिक गोष्ट ही आहे की तो आपले वक्तव्य या शब्दांनी सुरू करतो, “मला ‘प्रभूजी, प्रभूजी’ असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही.” आणि त्यानंतर तो पुन्हा



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 2 06-08-2025 23:20:04

म्हणतो, “त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, ‘प्रभो, प्रभो.”

## “प्रभो, प्रभो”

संपूर्ण पवित्र शास्त्रात अशा फक्त पंधरा घटना आहेत जिथे एखाद्याला त्याच्या किंवा तिच्या नावाची पुनरावृत्ती करून संबोधित केले गेले आहे. मी येथे त्यांपैकी काहींचा उल्लेख करतो:

- मोरिया पर्वतावर अब्राहामाने आपला पुत्र इसहाक याला वधण्यासाठी हात पुढे करून सुरा घेतला, तेव्हा देवाने शेवटच्या क्षणी हस्तक्षेप केला आणि प्रभूच्या दूताद्वारे अब्राहामाला उद्देशून म्हटले : “अब्राहामा! अब्राहामा!” “तू मुलावर आपला हात चालवू नकोस” (उत्पत्ति 22:11-12).
- याकोब मिसरात जाण्याच्या विचाराने भयभीत झाला होता. आणि देवाने त्याला धीर देण्यासाठी प्रगट होऊन म्हटले, “याकोबा, याकोबा” (उत्पत्ति 46:2).
- होरेब पर्वतावरील जळत्या झुडपातून देव मोशेशी बोलला व म्हणाला, “मोशे, मोशे!” (निर्गम 3:4).
- देवाने मध्यरात्री शमुवेल या तरुण मुलास हाक मारून म्हटले, “शमुवेला, शमुवेला!” (1 शमुवेल 3:10).
- बेथानीमध्ये मार्थाची कानउघाडणी करताना येशू तिला म्हणाला, “मार्था, मार्था” (लूक 10:41).
- येशूने यरुशलेम शहराबद्दल शोक केला व मोठ्याने म्हणाला : “यरुशलेमे, यरुशलेमे”, संदेष्ट्यांचा घात करणारे व तुझ्याकडे पाठवलेल्यांना दगडमार करणारे! जशी कोंबडी आपली पिले पंखांखाली



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 3 06-08-2025 23:20:04

एकत्र करते तसे तुझ्या मुलाबाळांना एकत्र करण्याची कितीदा माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती!" (लूक 13:34)

- पेत्राने आपली दृढनिष्ठा प्रत्येक परिस्थितीत टिकेल असे सांगितले, पण येशूने त्याला म्हटले, "शिमोना, शिमोना, पाहा, तुम्हांला गव्हासारखे चाळावे म्हणून सैतानाने मागणी केली." (लूक 22:31)
- दिमिष्कच्या वाटेवर येशूने शौलाला म्हटले, "शौला, शौला, तू माझा छळ का करतोस?" (प्रेषितांची कृत्ये 9:4).
- पवित्र शास्त्रातील या पुनरावृत्तीचे कदाचित सर्वात मार्मिक उदाहरण वधस्तंभावरून येशूच्या आरोळीत दिसून येते : "माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?" (मत्तय 27:46).

इब्री भाषेत ह्या दुर्मिळ पुनरुपी संबोधनाला एक विशिष्ट व्याकरणात्मक महत्व आहे. जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्याचं नाव पुनःपुन: घेऊन त्याच्याशी संवाद साधते, तेव्हा त्या पुनरुक्तीतून एका घनिष्ठ, सखोल वैयक्तिक नात्याची छटा प्रकट केली जाते.

म्हणून, डोंगरावरील उपदेशात येशू स्पष्ट करतो की, शेवटच्या दिवशी लोक त्याच्याकडे येऊन फक्त "प्रभू, आम्ही तुझे आहोत; आम्ही तुझे दास आहोत" असे म्हणणार नाहीत, तर ते त्याला वैयक्तिक जवळीकतेच्या शब्दांनी संबोधित करतील: "प्रभो, प्रभो," जणू काही ते त्याला वैयक्तिक आणि खोल पातळीवर ओळखतात. परंतु त्यांनी त्यांच्या मनात असे घनिष्ठ नाते जरी गृहीत धरून एक प्रकारच्या जवळीकपणाचा दावा केला असला, तरी येशू त्यांना स्पष्टपणे म्हणेल: "मला तुमची कधीच ओळख नव्हती; अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा."

येशू म्हणतो की असे बरेच लोक आहेत जे ख्रिस्ती असल्याचा दावा करतात,



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 4 06-08-2025 23:20:04

जे ख्रिस्ताचे नाव घेतात आणि त्याला “प्रभु” या गौरवी उपाधीने संबोधतात, पण प्रत्यक्षात ते देवाच्या राज्यात आहेतच असे नाही. त्यांचा त्याच्याशी काहीही वास्तविक संबंध नसतो, आणि ते अंतिम न्यायाच्या दिवशी टिकूही शकणार नाहीत. या घोषणेतील सर्वात भयावह बाब म्हणजे हे लोक चर्चमध्ये बॅक-बेंचर्स नसतात. उलट, ते चर्चच्या जीवनात पूर्णपणे समरस झालेले असतात, सेवाकार्यात मोठ्या आवेशाने गुंतलेले असतात, आणि कदाचित त्यांची ओळखही ख्रिस्ती म्हणून स्थापित झालेली असते. असे असले तरी, येशू त्यांना ओळखत नाही आणि त्यांना आपल्या उपस्थितीतून हाकलून लावतो.

मी ही गोष्ट या पुस्तिकेच्या प्रारंभीच मांडत आहे कारण जेव्हा आपण ख्रिस्ती म्हणून विश्वासाची कबुली देतो, तेव्हा एक अत्यंत गंभीर प्रश्न स्वतःला विचारणे आवश्यक ठरते: शेवटच्या दिवशी न्याय केला जाण्यासाठी उभे राहणारे, राज्यात प्रवेशाची अपेक्षा ठेवणारे आणि येशूला जिव्हाळ्याच्या शब्दांत संबोधित करणारे, परंतु प्रवेश नाकारण्यात आलेले जे लोक असतील, त्यांच्यापैकी आपणही तर नसणार ना, हे आपल्याला कसे कळेल? आपण कृपेच्या स्थितीत असल्याचा जो आत्मविश्वास बाळगतो, तो खरा आहे की फसवा, हे आपल्याला कसे कळेल? आपण स्वतःची फसवणूक केली नाही, याची खातरी कशी करून घ्यावी? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आपण खरोखरच तारण पावलेलो आहोत का, याची खातरजमा आपण कोणत्या आधारावर करणार?

## एक वादग्रस्त सिद्धांत

शतकानुशतके, तारणाची खातरी हा प्रश्न ख्रिस्ती मंडळींत वादाचा विषय ठरत आलेला आहे. इतकेच नव्हे तर काही मंडळींनी तर अशी शंकाही व्यक्त केलेली आहे की, या जीवनात एखाद्या व्यक्तीस तारणाची खातरी मिळवता येते का?



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 5 06-08-2025 23:20:04

उदाहरणार्थ, सोळाव्या शतकात भरवण्यात आलेल्या कौन्सिल ऑफ ट्रेंटमध्ये रोमन कॅथलिक मंडळीने असा निष्कर्ष दिला की, काही अत्यंत दुर्मिळ आणि अपवादात्मक प्रसंग वगळता, कोणालाही तारणाची खातरी होणे शक्य नाही. रोमच्या मंडळीने पुढे असे शिकवले की, केवळ काही निवडक संत, ज्यांना देव त्यांच्या स्थितीबाबत विशेष प्रकटीकरण देतो, त्यांनाच तारणाची खातरी प्राप्त होते. मात्र, चर्चचा सामान्य सदस्य तारणाची खातरी बाळगण्याची अपेक्षा करू शकत नाही.

रोमन कॅथलिक मंडळीचा असा दावा आहे की बहुतेक “तारणाच्या खातरी” या सरतेशेवटी केवळ अनुमानांवर, वैयक्तिक मतांवर आणि कल्पनांवर आधारलेल्या असतात, आणि त्या कल्पना अशा हृदयातून येतात, ज्यास बायबल कपटी म्हणते. शास्त्र सांगते की, “हृदय सर्वांत कपटी आहे; ते असाध्य रोगाने ग्रस्त आहे, त्याचा भेद कोणास समजतो?”(यिर्मया 17:9). त्यामुळे रोमन कॅथलिक मंडळी म्हणते, स्वतःची फसवणूक करणे व केवळ वैयक्तिक मतांवर आपल्या आत्म्याच्या स्थितीबद्दल आपल्या आत्मविश्वासाचा पाया बांधणे आपल्यासाठी सोपे आहे. परिणामी, प्रकटीकरणाच्या काही विशेष कृतींवाचून तारणाची खातरी शक्य नाही.

केवळ रोमन कॅथलिक चर्चनेच तारणाच्या खातरीचा सिद्धांत नाकारला नाही. तर काही प्रोटेस्टंट लोकांचा सुद्धा असा विश्वास आहे की एखाद्या व्यक्तीला आजच्या क्षणी तारणाची खातरी असू शकते, पण उद्याही ती खातरी कायम राहील हे नक्की नाही. कारण त्यांच्या मते, एकदा विश्वासावर उभे राहिलेले लोक नंतर अविश्वासात पतन पाऊ शकतात आणि आपले तारण गमावू शकतात. म्हणूनच इतिहासात तारणाच्या खातरीचा सिद्धांत, पवित्र जनांचे अखेरपर्यंत टिकून राहणे (perseverance of the saints) या सिद्धांताशी घट्टपणे जोडलेला आहे. रोमन कॅथलिक मंडळी जिथे म्हणते की आम्हाला अजिबात खातरी मिळू शकत



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 6 06-08-2025 23:20:04

नाही, तिथे हे प्रोटेस्टंट म्हणतात की तारणाची खातरी मर्यादित काळापुरती मिळू शकते; मात्र आपली अंतिम स्थिती काय असेल हे निश्चितपणे सांगता येत नाही.

यानंतर रिफॉर्म्ड ईश्वरविज्ञान येते, म्हणजेच माझी स्वतःची धर्मशास्त्रीय मतप्रणाली, जे असे शिकवते की आपण केवळ आज कृपेच्या अवस्थेत आहोत, याची आपण खातरी बाळगू शकतो एवढेच नाही, तर आपला मृत्यू होईल त्या क्षणीसुद्धा आपण कृपास्थितीतच असणार, याचीही आपण पूर्ण खातरी बाळगू शकतो.

## पेरणी करणाऱ्याचा दाखला

कोणाचे खरोखर तारण झाले आहे आणि कोणाचे नाही, या प्रश्नाला येशू पेरणी करणाऱ्याचा दाखला देऊन स्पष्ट करतो :

> 'त्या दिवशी येशू घरातून निघून समुद्रकिनाऱ्याशी जाऊन बसला तेव्हा लोकांचे थवेच्या थवे त्याच्याजवळ जमले; म्हणून तो मचव्यात जाऊन बसला व सर्व लोक किनाऱ्यावर उभे राहिले मग त्याने त्यांना दाखल्यांनी पुष्कळ गोष्टी सांगितल्या तो म्हणाला, "पाहा, पेरणारा पेरणी करण्यास निघाला व तो पेरत असता काही बी वाटेवर पडले व पाखरांनी येऊन ते खाऊन टाकले काही खडकाळीवर पडले, तेथे त्याला फारशी माती नव्हती, व माती खोल नसल्यामुळे ते लवकर उगवले; व सूर्य वर आला तेव्हा ते करपले व त्याला मूळ नव्हते म्हणून ते वाळून गेले काही काटेरी झाडांमध्ये पडले; मग काटेरी झाडांनी वाढून त्याची वाढ खुंटवली काही चांगल्या जमिनीत पडले; मग त्याचे कोठे शंभरपट, कोठे साठपट तर कोठे तीसपट, असे पीक आले ज्याला कान आहेत तो ऐको." (मत्तय 13:1-9)



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 7 06-08-2025 23:20:04

या प्रसिद्ध दाखल्याचा संदर्भ लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. त्याच्या आधी, कोणीतरी येशूला म्हणतो, “पाहा, तुझी आई व तुझे भाऊ तुझ्याशी बोलायला बाहेर उभे आहेत” (मत्तय 12:47). पण येशू उत्तर देतो, “माझी आई कोण व माझे भाऊ कोण?” (व. 48) मग, त्याच्या शिष्यांना सूचित करून, तो म्हणतो: “पाहा, माझी आई व माझे भाऊ! कारण जो कोणी माझ्या स्वर्गातील पित्याच्या इच्छेप्रमाणे करतो, तो माझा भाऊ, बहीण व आई आहे” (व.49-50) येशू म्हणतो की त्याचा खरा भाऊ तो नाही जो फक्त त्याच्या मागे जाण्याचा निर्णय घेतो, तर तो आहे जो पित्याच्या इच्छेप्रमाणे करतो.

आपण हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की यहूदाला शिष्य होण्यासाठी कोणीही भाग पाडले नव्हते. यहूदाने स्वतःहून येशूच्या मागे जाण्याचा निर्णय घेतला होता. यहूदाने स्वतःहून येशूच्या शिष्यवर्गात प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला होता, व तीन वर्षे पृथ्वीवरील सेवाकाळात तो आपल्या प्रभूबरोबर होता. तरीसुद्धा, शास्त्र आपल्याला सांगते की तो सैतान होता (योहान 6:70). यहूदा खऱ्या अर्थाने आत्म-परिवर्तन पावला होता आणि नंतर कृपास्थितीतून पतन पाऊन माघारी गेला, असे नव्हते; उलट, तो येशूच्या अतिशय जवळ असूनही, कधीच खरा आत्म-परिवर्तन पावलेला मनुष्य नव्हता. हे सत्य आपल्या आत्म्यांच्या स्थितीचा विचार करताना आपल्याला थांबवून अंतर्मुख होण्यास भाग पाडते.

मत्तयच्या पुस्तकात थोडे पुढे, येशू पेरणाऱ्याच्या दाखल्याचे स्पष्टीकरण देतो. शुभवर्तमानाच्या वृत्तांतात ही एक दुर्मिळ घटना आहे की जिथे आपल्याला एखाद्या दाखल्याचे स्पष्टीकरण दिले जाते. हे स्पष्टीकरण सर्वात उपयुक्त आहे कारण हा दाखला सामान्य दाखल्यांपेक्षा वेगळा आहे.

बहुतेक दाखल्यांचा उद्देश एकच मुख्य मुद्दा अधोरेखित करणे असतो. त्यामुळे दाखल्यांना रूपकांचे स्वरूप देणे हे सामान्यतः धोका उत्पन्न करणारे ठरते, कारण



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 8 06-08-2025 23:20:05

रूपकात प्रत्येक घटकाला प्रतीकात्मक अर्थ असतो. मात्र, पेरणी करणाऱ्याचा दाखला एका रूपकाच्या पातळीच्या जवळ येतो, कारण येशू त्यामध्ये अनेक तात्त्विक लागूकरणे स्पष्ट करतो.

येशू आपले स्पष्टीकरण या शब्दांत सुरू करतो: "आता तुम्ही पेरणाऱ्याचा दाखला ऐकून घ्या कोणी राज्याचे वचन ऐकतो पण ते त्याला समजत नाही, तेव्हा तो दुष्ट येऊन त्याच्या अंतःकरणात पेरलेले ते हिरावून घेतो; वाटेवर पेरलेला तो हा आहे" (मत्तय 13:18-19). येशू ज्या पहिल्या गटाबद्दल बोलतो, तो त्या बीजांद्वारे दर्शविण्यात येतो जे वाटेवर पडले होते. पुरातन काळात, पेरणी करताना शेतकरी प्रथम बी टाकायचा आणि त्यानंतर जमीन नांगरायचा. पण जी बीजे वाटेवर किंवा पायवाटांवर पडायची, ती नांगरली जात नसत. ती कठीण जमिनीवर पडून राहायची, रुजण्यासाठी त्यांना कोणताही आधार मिळत नसे आणि नंतर पक्षी येऊन ती खाऊन टाकत. येशू या पक्ष्यांची तुलना सैतानाशी करतो. अनेक लोक या प्रकारच्या बीजांप्रमाणे असतात — ते सुवार्तेचा उपदेश ऐकतात, परंतु त्याचा त्यांच्या अंतःकरणावर काहीही परिणाम होत नाही. वचन त्यांच्यामध्ये मुळं रोवू शकत नाही.

येशू पुढे म्हणतो, "खडकाळीवर पेरलेला तो हा आहे की, तो वचन ऐकतो व ते तत्काळ आनंदाने ग्रहण करतो; परंतु त्याला मूळ नसल्याकारणाने तो थोडाच वेळ टिकतो, व वचनामुळे संकट आले किंवा छळ झाला म्हणजे तो लगेच अडखळतो" (मत्तय 13:20-21).

तुम्ही एखाद्या सुवार्तिक सभेला गेला असाल, किंवा टीव्हीवर अशी सभा पाहिली असेल, तर तुम्हाला असा अनुभव आलेला असेल की सुवार्तेच्या आवाहनाला प्रतिसाद देत, मोठ्या प्रमाणावर लोक स्टेजसमोर गर्दी करतात. मी एकदा अशाच एका भव्य आंतरराष्ट्रीय सुवार्तिक मोहिमेचा अहवाल वाचला होता, ज्यात म्हणे



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 9 06-08-2025 23:20:05

लाखो लोकांनी ख्रिस्तासाठी निर्णय घेतला होता. तो अहवाल वाचताना माझ्या मनात एक प्रश्न उभा राहिला : या लाखो निर्णयांपैकी किती निर्णय खऱ्या आत्म-परिवर्तनाचे निदर्शक होते, आणि किती फसवे किंवा क्षणिक भावनांवर आधारित होते? अशा कार्यक्रमांमध्ये लोकांना जे काही ऐकायला मिळते, ते त्यांच्या मनाला भिडते; आणि त्या भावनिक भारात, ते ख्रिस्ताच्या मागे जाण्याचा निर्णय घेतात. परंतु एक गोष्ट स्पष्टपणे सिद्ध झालेली आहे की अशा सुवार्तिक सभांमध्ये पुढे येणाऱ्या अनेक जणांची वचनबद्धता फार लवकर क्षीण होते आणि शेवटी पूर्णपणे लोप पावते. अशा प्रकारचे प्रतिसाद बहुतेक वेळा मूळ नसलेले आणि निराधार ठरतात.

मी सुवार्तेच्या कार्यक्रमांच्या यशाबाबत येणाऱ्या अहवालांवर टीका करताना फारसे कठोर व्हावे, अशी माझी इच्छा नाही. प्रत्येक सुवार्ता-चळवळीला आपली सेवा किती प्रभावी होती याचे मापन करण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते, याची मला जाणीव आहे. चर्च-संस्था सामान्यतः त्यांच्या मंडळीतील सदस्यसंख्येचा आणि ती वेळोवेळी कशी वाढते याचा अहवाल सादर करतात. तर सुवार्तिक सेवा संस्था पुढे येणारे, हात वर करणारे, कार्डवर स्वाक्षरी करणारे, किंवा प्रार्थना करणारे लोक किती होते, याची आकडेवारी सादर करतात. लोकांचा प्रतिसाद कितपत परिणामकारक ठरतो आहे, याचे मोजमाप करण्यासाठी या संस्थांना कोणत्यातरी प्रकारची आकडेवारी प्रणाली आवश्यक वाटते.

परंतु, आध्यात्मिक वास्तवाचे मोजमाप नेमके कसे करावे? जे कोणी प्रत्यक्ष सुवार्ता-सेवेत सहभागी झालेले आहेत, त्यांना हे ठाऊक असते की आपण कोणाचे अंतःकरण पाहू शकत नाही. म्हणून, जे दृश्यरूपात दिसते, म्हणजे लोकांनी घेतलेले निर्णय, त्यांची गणना करणे, हे दुसरे उत्तम मोजमापाचे साधन मानले जाते. पण येशू पेरणाऱ्याच्या दाखल्यात याविषयी आपल्याला सावधगिरीचा इशारा देतो. तो



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 10 06-08-2025 23:20:05

सांगतो की पुष्कळ लोक सुवार्ता मोठ्या आनंदाने ऐकतात, परंतु विश्वासात टिकत नाहीत. ही दुसऱ्या प्रकारची बीजे खडकाळ जमिनीत पडतात—जिथे जमीन इतकी उथळ असते की त्यांची मूळं खोलवर रोवली जात नाहीत. आणि सूर्य वर येताच ती कोवळी रोपे करपतात. परिणामी, ती वाळून मरून जातात आणि काहीच फळ उत्पन्न करत नाहीत. येशू स्पष्ट करतो की अशा लोकांचे विश्वासापासून दूर जाणे हे अपरिहार्यपणे येणाऱ्या संकटांमुळे व छळांमुळे घडते—जे विश्वासाच्या मार्गावर येणारच.

तिसऱ्या प्रकारच्या बीजाचे स्पष्टीकरण देताना येशू म्हणतो, “काटेरी झाडांमध्ये पेरलेला तो हा आहे की, तो वचन ऐकतो, परंतु संसाराची चिंता व द्रव्याचा मोह वचनाची वाढ खुंटवतात आणि तो निष्फळ होतो.” (मत्तय 13:22). हे बी अशा लोकांच्या श्रेणीचे प्रतिनिधित्व करते, जे वचन ऐकतात आणि प्रथमदर्शनी ते स्वीकारतात, परंतु नंतर या जगाच्या चिंता आणि संपत्तीच्या आकर्षणांनी इतके भारावून जातात की त्यामुळे वचनाची वाढ खुंटते.

> शेवटी, येशू म्हणतो: “चांगल्या जमिनीत पेरलेला तो हा आहे की, तो वचन ऐकून ते समजतो; तो फळ देतोच देतो; कोणी शंभरपट, कोणी साठपट, तर कोणी तीसपट असे देतो.” मत्तय 13:23

ह्याप्रमाणे, हे तर स्पष्टच आहे की अनेक लोक सुवार्तेच्या संदेशाला आनंदाने प्रतिसाद देतात, परंतु ते शेवटपर्यंत विश्वासात टिकून राहत नाहीत. देवाचे वचन ऐकणाऱ्या प्रत्येकाचे तारण होतेच असे नाही, आणि जे सुरुवातीला प्रतिसाद देतात त्यांच्याही बाबतीत हेच खरे ठरते. जे खरोखर तारले गेलेले असतात, ते वचनाचे पालन करणारे म्हणून स्वतःला सिद्ध करतात. जेव्हा बीज रुजते आणि वाढते, तेव्हाच खरे फळ उत्पन्न होते.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 11 06-08-2025 23:20:05

## विश्वासाच्या फळांची आवश्यकता

विश्वासाच्या फळांविषयी विचार करताना आपल्याला हे विसरून चालणार नाही की आपण आपल्या कर्मांमुळे तारले जात नाही. आपण केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरतो. तरीही, आपल्याला हे देखील आठवते की सोळाव्या शतकातील रिफॉर्म चळवळीतील प्रमुख धर्म-सुधारक, उदाहरणार्थ मार्टिन ल्यूथर, यांचे असे म्हणणे होते की आपण केवळ विश्वासामुळे नीतिमान ठरतो, पण असा विश्वास जो कधीही निव्वळ एकटा नसतो.

हे मत रोमन कॅथलिक मताशी पूर्णपणे विसंगत आहे. कॅथलिक शिकवणीनुसार, एखाद्या व्यक्तीला नीतिमान ठरण्यासाठी विश्वास आवश्यक असतो, पण त्याबरोबरच सत्कर्मेही आवश्यक असतात. म्हणजेच, कॅथलिक दृष्टीकोन असा आहे

**रोमन कॅथलिक मत : विश्वास + कर्मे = नीतिमान ठरणे.**

**परंतु, प्रोटेस्टंट मत असे आहे : विश्वास = नीतिमान ठरणे + सत्कृत्ये.**

प्रोटेस्टंट दृष्टिकोनाप्रमाणे, सत्कृत्ये ही कृपेच्या स्थितीची फलश्रुती असतात, म्हणजे आपण ज्या कृपेच्या स्थितीत आहोत तिचे ते प्रदर्शन असते. ती नीतिमान ठरण्यात काहीच भर घालत नाहीत. पाप्याला नीतिमान ठरवणारी एकमेव धार्मिकतेची कामे ही ख्रिस्ताची कामे आहेत. म्हणूनच, जेव्हा आपण म्हणतो की आपण केवळ विश्वासाने नीतिमान ठरतो, तेव्हा त्याचा अर्थ असा असतो की आपण केवळ ख्रिस्ताद्वारे, त्याच्या कार्याद्वारे नीतिमान ठरतो; आमची कर्मे आमच्या नीतिमान ठरण्यासाठी गणली जात नाहीत.

यावरून कदाचित् कोणी म्हणेल, “म्हणजे मग मला फळं देण्याची गरजच नाही. मी जर विश्वासाने तारलो गेलो असेन, तर मला नीतिमत्वाचे कोणतेही प्रकट



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 12 06-08-2025 23:20:05

स्वरूप दाखवण्याची आवश्यकता नाही." परंतु लक्षात ठेवा : याकोब आपल्या पत्रात सांगतो (याकोब 2:26), आणि ल्यूथरनेही हेच अधोरेखित केलं आहे, की नीतिमान ठरवणारा विश्वास हा मृत नसतो. तो एक जिवंत, क्रियाशील आणि परिणामकारी विश्वास असतो. खरा विश्वास, जो ख्रिस्ताशी आपल्याला जोडतो, तो नेहमी सत्कृत्यांद्वारे प्रकट होतो. जर समीकरणाच्या उजव्या बाजूला सत्कृत्ये दिसत नसतील, तर याचा अर्थ असा होतो की समीकरणाच्या डाव्या बाजूला विश्वासच नाही. आणि जर डावीकडे विश्वास नसेल, तर उजवीकडे नीतिमान ठरण्याचा प्रश्नच येत नाही.

ह्याप्रमाणे, विश्वास आपल्याला ख्रिस्ताशी जोडतो. आणि जर आपला विश्वास खरा आणि प्रामाणिक असेल, तर आपण शेवटच्या दिवशी जेव्हा "प्रभु, प्रभु" असे म्हणत ख्रिस्तासमोर उभे राहू, त्यावेळी आपल्याला त्याच्या तोंडून "अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापासून दूर व्हा" असे शब्द ऐकावे लागणार नाहीत. उलट, आपल्यामधून अशी फळांची प्रचिती दिसून येईल, जी आपला विश्वास खरा आहे याचे साक्षीपत्र ठरेल.

ख्रिस्ती विश्वासणारे ज्या प्रमाणात फळे देतात, त्यामध्ये विविधता असू शकते. येशूने म्हटलें, "चांगले बी काही चांगल्या जमिनीत पडले; मग त्याचे कोठे शंभरपट, कोठे साठपट तर कोठे तीसपट, असे पीक आले." (मत्तय 13:23ब). काही खरे विश्वासू इतर विश्वासणाऱ्यांइतके फलद्रूप नसतात, पण प्रत्येक खरा विश्वासणारा काही ना काही प्रमाणात फळ नक्कीच देतो. जो काहीच फळ देत नाही, तो खरा विश्वासणारा नाहीच. म्हणूनच येशू म्हणतो, "तुम्ही त्यांना त्यांच्या फळांवरून ओळखाल" (मत्तय 7:16अ), त्यांच्या केवळ कबुलीवरून नाही.

जेव्हा एखादी व्यक्ती अशा ख्रिस्ती संस्कृतीत पूर्णपणे सामावलेली असते, जिथे येशूच्या मागे जाण्याचा निर्णय घेणे, वेदीपाशी पुढे येऊन प्रतिसाद देणे आणि



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 13 06-08-2025 23:20:05

पाप्याची प्रार्थना उच्चारणे यावर मोठा भर दिला जातो, तेव्हा एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा सहजपणे दुर्लक्षित होतो : तो म्हणजे, येशूचे अनुसरण करण्याचा निर्णय घेतल्याने कधीही कोणाचे खरे आत्म-परिवर्तन घडलेले नाही. कारण, कोणत्याही व्यक्तीचे आत्म-परिवर्तन हे तिच्या निर्णयामुळे होत नाही; ते केवळ पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यामुळेच घडते. कोणी फक्त निर्णय घेतला, प्रवचनमंचाकडे चालत आला, हात वर केला, किंवा कार्डावर सही केली म्हणून त्याला स्वर्गाच्या राज्यात प्रवेश मिळाला असे नाही. आपला देवाच्या राज्यात प्रवेश होतो तो केवळ आपल्या अंतःकरणात खरा विश्वास असतो म्हणून.

गैरसमज करून घेऊ नका, सार्वजनिकरीत्या विश्वासाची कबुली देण्यात काहीच अनुचित नाही; उलट, ती देणे आवश्यकच आहे. जो कोणी नीतिमान ठरवलेला आहे, त्याने त्या विश्वासाची कबुली सार्वजनिकपणे द्यावी, असे त्याला पाचारण केलेले असते. ख्रिस्ती असलेल्या प्रत्येक व्यक्तीला इतरांसमोर ख्रिस्ताची कबुली द्यावी, असा त्याला आदेशच असतो. समस्या तेव्हा उद्भवते, जेव्हा आपण विश्वासाच्या अशा सार्वजनिक कबुलीला खऱ्या परिवर्तनाची कसोटी मानतो. कारण येशू अशा लोकांविषयी बोलतो जे ओठांनी त्याचा सन्मान करतात, पण त्यांची अंतःकरणं त्याच्यापासून दूर असतात (मत्तय 15:8). कोणताही मनुष्य केवळ विश्वासाची कबुली देऊन नीतिमान ठरलेला नाही.

मग, याचा अर्थ असा घ्यावा का की तारणाच्या खातरीचा प्रश्न सोडविण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे आपल्या जीवनातील फळांचे परीक्षण करणे, की ती फळे आपल्या विश्वासाच्या कबुलीशी सुसंगत आहेत की नाही? ख्रिस्ती जीवनात आत्मपरीक्षणाला एक निश्चित स्थान आहे, आणि या विषयावर मी प्रकरण-4 मध्ये अधिक सविस्तर सांगणार आहे. तरीही, आपल्यापैकी कोणीही आपण जसा विश्वास ठेवण्याचा दावा करतो, त्या कसोटीने एक साकार जीवन जगण्यात



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 14 06-08-2025 23:20:05

यशस्वी होत नाही. जर आपण केवळ आपल्या आचरणाकडे लक्ष केंद्रित केले, तर खरी खातरी ही फारच निसरडी, अस्थिर आणि अनिश्चित ठरते.

म्हणून, खोटी खातरी बाळगून राहणं शक्य आहे, आणि खरी खातरी मिळवणं कठीण ठरू शकतं. तर मग, आपण ज्या विश्वासाची कबुली देतो, ती खऱ्या तारणदायी कृपेने प्रेरित आहे का, हे आपण निश्चितपणे कसं ओळखू शकतो? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण आपण ख्रिस्ती या नात्याने कोठे आहोत व आपल्या भावनांवर, आपल्या सांत्वनावर व ख्रिस्ती या नात्याने आपल्या वागणुकीवर त्याचा प्रचंड प्रभाव पडतो. आपण कृपेच्या स्थितीत आहोत की नाही हा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे, आणि या पुस्तिकेतील उर्वरित भाग आपल्याला हाच प्रश्न कसा सोडवायचा, या विषयावर मार्गदर्शन करील.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 15 06-08-2025 23:20:05

CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 16 06-08-2025 23:20:05

## प्रकरण 2

# चार प्रकारचे लोक

मी सिनसिनाटीमध्ये एका गृहस्थाला सुवार्ता सांगत होतो, व मी सुरुवात करतांना त्याला "सुवार्ता जागृती चळवळ" प्रेरित प्रश्नांपैकी पहिला प्रश्न विचारला: "तुम्ही तुमच्या आध्यात्मिक जीवनात अशा टप्प्यावर आला आहात का, जिथे तुम्हाला ठाम खातरी आहे की, जर आज रात्री तुमचा मृत्यू झाला, तर तुम्ही स्वर्गात जाल?" त्या गृहस्थाने क्षणभरही न डगमगता थेट माझ्या डोळ्यात डोळे घालून उत्तर दिले: "ओह, नाही. मला खातरी आहे की मी तारलेला नाही. मला खातरी आहे की मी नरकातच जाईल." त्या उत्तराने मी सुन्न झालो. कारण मी यापूर्वी कधीही अशा व्यक्तीला भेटलो नव्हतो ज्याला आपले भवितव्य नरकच आहे, याची इतकी ठाम खातरी होती. तो माणूस पूर्णपणे देवविरहित जीवन जगत



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 17 06-08-2025 23:20:05

होता, आणि त्याला हे माहीत होते की तो देवविरहित जीवन जगत आहे. त्याला हेही ठाऊक होते की अशा अधार्मिक जीवनाचे परिणाम काय होतील, तरीसुद्धा त्याला काहीही वाटत नव्हते.

तारणाच्या खातरीच्या संदर्भात पाहिले, तर जगात चार प्रकारचे लोक आहेत. कुठलाही अपवाद न वगळता, प्रत्येक जिवंत व्यक्ती या चार प्रकारांपैकी एका गटात निश्चितपणे मोडते. ही चार गटवारी अशी आहे: 1) लोक जे तारलेले आहेत आणि त्यांना ते माहीत आहे, 2) लोक जे तारलेले आहेत, परंतु त्यांना ते माहीत नाही, 3) (वर उल्लेख केलेल्या माणसासारखे) लोक जे तारलेले नाहीत आणि त्यांना ते माहीत आहे, आणि 4) लोक जे तारलेले नाहीत, परंतु त्यांना ते माहीत नाही. चला तर, आपण या वर्गवारीकडे अधिक बारकाईने पाहूया.

## लोक जे तारलेले आहेत आणि त्यांना ते माहीत आहे.

प्रथम श्रेणी —ज्यांचे तारण झाले आहे आणि त्यांना ते माहीत आहे. अशा लोकांना पूर्ण खातरी असते की ते देवाच्या कृपेच्या अवस्थेत आहेत. त्यांच्या दृष्टीने हा विषय एकदा कायमचा निकाली ठरलेला असतो.

तुम्ही कधीतरी अशा चर्चेत सहभागी झाला असाल, जिथे तुम्ही एखाद्याला काही विचारता, तो काहीतरी प्रतिपादन देतो, आणि तुम्ही विचारता, "तुम्हाला खातरी आहे का?" तो म्हणतो, "होय, मला खातरी आहे." आणि मग तुम्ही पुढचा प्रश्न विचारता, ""तुमच्या खातरीबद्दल तुम्हाला खातरी आहे का?" आपण जेव्हा "खातरी" किंवा "निश्चितता" याविषयी बोलतो, तेव्हा आपण केवळ तात्त्विक गटांविषयी बोलत नसतो. उलटपक्षी, आपण त्या विशिष्ट वक्तव्यांशी संबंधित असलेल्या आपल्या भावनिक मनःस्थितीचे वर्णन करत असतो.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 18 06-08-2025 23:20:05

सत्याच्या दाव्यांची खातरी ही एका विस्तृत, अखंड आणि सातत्यपूर्ण प्रवाहात कार्य करते. उदाहरणार्थ, कोणी तुम्हाला विचारू शकतो, “देव आहे यावर तुमचा विश्वास आहे का?” या प्रश्नाला अनेक प्रकारची उत्तरं देता येतात. तुम्ही म्हणू शकता, “नाही, माझा विश्वास नाही,” “मला नाही वाटत की देव आहे,” “मला माहीत नाही, पण वाटते की कुठेतरी देव असावा,” “कदाचित,” “हो, देव आहे यावर माझा विश्वास आहे,” किंवा “म्हणजे काय? अर्थातच, देव आहे यावर माझा विश्वास आहे.” ही प्रत्येक उत्तरं, दिलेल्या विधानावर व्यक्तीच्या विश्वासाची वेगवेगळी पातळी दाखवतात.

म्हणून जेव्हा आपण तारणाच्या खातरीबद्दल बोलतो, तेव्हा आपण गणितातील खातरीसारख्या गोष्टींचा विचार करत नाही—जसे की दोन अधिक दोन हे चारच असते, या तत्वज्ञानावर ठेवलेला विश्वास. आपण ज्या खातरीबद्दल बोलतो ती एका वैयक्तिक अवस्थेची खातरी असते, आणि त्या खातरीची तीव्रता दिवसेंदिवस बदलत राहते. काही वेळा असे क्षण येतात, जेव्हा कोणी मला विचारतो, “ मिस्टर स्प्रौल, तुम्हाला खातरी आहे का की तुमचं तारण झालं आहे?” आणि मी उत्तर देतो, “होय, मला पूर्ण खातरी आहे.” पण दुसऱ्याच दिवशी, जर मी अपराधभावनेच्या ओझ्याखाली दबलेलो असेन, तर मी कदाचित म्हणेन, “मला वाटतंय, कदाचित्.” ख्रिस्ती जीवनात अशा चढ–उतारांचा अनुभव सामान्य आहे.

तरीही, तारणाची खरी खातरी शंका असतानाही टिकून राहते. कारण ती केवळ भावनांवर आधारलेली नसते, हे आपण पुढे पाहूच. या गटात असलेल्या व्यक्तीकडे एक असा पाया असतो, ज्याच्या आधारे तो पूर्ण विश्वासाने म्हणू शकतो: “कारण मी ज्याच्यावर विश्वास ठेवला आहे, त्याला मी जाणतो आणि तो माझी ठेव त्या दिवसासाठी राखण्यास शक्तिमान आहे असा माझा भरवसा आहे.” (2 तीमथ्य. 1:12).



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 19 06-08-2025 23:20:05

## लोक जे तारलेले आहेत, परंतु त्यांना ते माहीत नाही

दुसरा गट अशा लोकांचा आहे,  जे तारलेले तर आहेत, पण आपण तारलेले आहोत हे त्यांना माहीत नसते. एखादी व्यक्ती कृपा-प्राप्त असू शकते, पण तरीही तिला ती त्या स्थितीत आहे याची पूर्ण खातरी नसते. मी आधीच नमूद केले आहे की काही लोक (उदाहरणार्थ, रोमन कॅथलिक) पहिल्या गटाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात—म्हणजे ते जे तारले गेले आहेत आणि त्यांना त्याची खातरी आहे. कारण त्यांचा असा दावा असतो की तारणाची खातरी ही सामान्यतः मिळवणे शक्य नसते. त्याचप्रमाणे, काही लोक असाही युक्तिवाद करतात की कृपेच्या अवस्थेत खरोखर असणे, पण त्याची जाणीव न होणे, हे अशक्य आहे. त्यांचा तर्क असा असतो की तारणदायी विश्वासाचा केंद्रबिंदू हाच आहे—एक असा तारणकर्ता ज्याच्यावर तुम्हीं विश्वास ठेवता की तो तुम्हाला तारेल. मग जर एखाद्या व्यक्तीला वाटत असेल की तिच्याकडे विश्वास आहे, पण त्याच वेळी तिला येशू ख्रिस्त तिला तारत आहे याची खातरी वाटत नसेल, तर तिच्याकडे खरोखर विश्वास आहे का?

या गोंधळाचा एक भाग ख्रिस्ती जीवनाविषयी असलेल्या त्या लोकप्रिय दृष्टिकोनाशी संबंधित आहे, जो एका नाट्यमय आत्म-परिवर्तनाच्या अनुभवावर जोर देतो. काही लोक खरोखरच अशा रीतीने येशूकडे येतात. उदाहरणार्थ, बिली ग्रॅहम सांगतात की त्यांना ख्रिस्ती झाल्याचा दिवस आणि वेळ स्पष्ट आठवतो. ते त्या विशिष्ट दिवसाचा उल्लेख करतात जेव्हा बेसबॉलचा खेळ आटोपल्यानंतर त्यांनी एका प्रचार सभेला हजेरी लावली होती. तेथे प्रवासी प्रचारक मॉर्डकाय हॅम उपदेश देत होते, आणि ग्रॅहम यांनी पुढे येऊन अचानक असे परिवर्तन अनुभवले ज्यामुळे त्यांचे जीवन पूर्णपणे बदलून गेले. माझाही असाच अनुभव आहे—माझ्या जीवनात येशू ख्रिस्ताशी झालेली भेट मी स्पष्टपणे सांगू शकतो: तारीख, वेळ, जागा, आणि नेमके काय घडले ते. पण काही इतर लोक मात्र, जसे बिली ग्रॅहम यांची पत्नी रूथ



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 20 06-08-2025 23:20:05

ग्रॅहम, त्यांना आपल्या परिवर्तनाचा काळसुद्धा लक्षात नाही—वर्ष तर जाऊच द्या.

मंडळीतील लोकांमध्ये अशी एक प्रवृत्ती आढळते की, आपण आपल्या स्वतःच्या आध्यात्मिक अनुभवांना सर्वसाधारण मूल्य मानतो. ज्या लोकांनी अकस्मात, नाट्यमय, दिमिष्कच्या मार्गावर पौलाला झाला तसे परिवर्तन अनुभवले आहे—ज्यांना विशिष्ट दिवस आणि वेळेही ठामपणे सांगता येते—ते कधी कधी अशा लोकांबद्दल संशय व्यक्त करतात, ज्यांना असा अनुभव आलेला नाही. त्यांना वाटते, “ज्या व्यक्तीला आपल्या तारणाचा विशिष्ट दिवस आणि वेळ सांगता येत नाही, ती खरोखर ख्रिस्ती असू शकते का?” त्याच वेळी, ज्यांना त्यांच्या परिवर्तनाचा दिवस आणि वेळ माहीत नाही, असे काही लोक अशा लोकांबद्दल संशय व्यक्त करतात, जे सांगतात की त्यांना अगदी ठाम माहीत आहे की त्यांनी पहिल्यांदा कधी विश्वास ठेवला. परंतु मुख्य बाब ही आहे: बायबल कुठेही असे सांगत नाही की आपल्याला आपल्या तारणाचा नेमका क्षण किंवा वेळ माहीतच असायला पाहिजे.

इथे विषय अधिक गंभीर आणि थोडा गुंतागुंतीचा होतो. कोणताही मनुष्य अर्धवट तारलेला असतो, अशा अर्थाने नवा जन्म कधीच अर्धवट घडत नाही. एखादी व्यक्ती एक तर पवित्र आत्म्याच्या कार्याद्वारे जन्मलेली असते किंवा अजीबात नसतेच. यात तडजोड नाही. तुमचा नव्याने जन्म झाला किंवा नाही, एवढेच काय तर महत्वाचे. नवा जन्म हे देवाचे असे कार्य आहे, ज्याद्वारे आपण अंधकाराच्या राज्यातून प्रकाशाच्या राज्यात स्थानांतरित केले जातो. हे आत्म-परिवर्तन खरे, वास्तविक असते आणि पवित्र आत्म्याच्या कार्याद्वारे ते तत्क्षणी घडते. त्यामुळे एखादी व्यक्ती एक तर या स्थितीत असते किंवा ती मुळीच नसते. नवा जन्म ही कुठली अंशगत प्रगत प्रक्रिया नाही; तो तात्काळ घडणारा अनुभव आहे.

पण जर हे खरे असेल, तर मग ज्या लोकांना त्यांच्या आत्म-परिवर्तनाचा दिवस आणि वेळ सांगता येत नाही, त्यांच्याविषयी शंका निर्माण होत नाही का?



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 21 06-08-2025 23:20:05

नाही. आपण परिवर्तन आणि परिवर्तनाचा अनुभव यामधील फरक ओळखणे अगत्याचे आहे. शिवाय, देवाचा आत्मा एखाद्या व्यक्तीच्या आत्म्यात जेव्हा त्याचे अलौकिक कार्य करतो, तेव्हा त्याची जाणीव लगेचच झालीच पाहिजे, असे नाही. म्हणूनच, ज्यांचे अनुभव आपल्यासारखे नाहीत, अशा लोकांचे मूल्यांकन करताना अनुभवांवर आधारित गट बनवणे अत्यंत धोकादायक आहे.

खरं तर, जरी मी माझ्या परिवर्तनाच्या अनुभवाविषयी वारंवार बोलत असलो, ज्याचा दिवस आणि वेळ मी नेमके सांगू शकतो, तरी मला हे उमजले आहे की, अशा अनुभवाचा एखाद्याच्या आत्म्यात देवाने केलेल्या कार्याशी आवश्यक तेवढा संबंध असतोच असे नाही. पवित्र आत्मा एखाद्या व्यक्तीचा नव्याने जन्म एक आठवडा, एक महिना, किंवा अगदी पाच वर्षे आधीही करू शकतो, आणि आंतरात्म्यात जे घडले आहे त्या वास्तविकतेची जाणीव त्या व्यक्तीला नंतर होते. म्हणून, मी माझ्या आत्म-परिवर्तनाचा विशिष्ट दिवस आणि क्षण यावर ठेवलेली खातरी ही केवळ त्या अनुभवापुरती मर्यादित असते, कारण अनुभवांच्या बाबतीत आपण स्वतःलाही फसवू शकतो.

खरं तर, ख्रिस्ती म्हणून आपण करू शकणारी सर्वात धोकादायक गोष्ट म्हणजे आपल्या अनुभवावरून आपले ईश्वरविज्ञान ठरवणे, कारण कोणाचाही अनुभव ख्रिस्ती जीवनासाठी नियम म्हणून ग्राह्य धरता येत नाही. आपले ईश्वरविज्ञान आपल्या भावना नव्हे, तर देवाच्या वचनावर आधारित असले पाहिजे. शिवाय, आपण अनुभवलेल्या घटनांचा अर्थ आणि त्यांचे महत्त्व चुकीचे समजण्याची शक्यता असते. म्हणूनच, आपले अनुभव पवित्र शास्त्राच्या प्रकाशात तपासून पाहावेत, जेणेकरून आपण आपल्या विश्वासाची व्याख्या आपल्या अनुभवांच्या आधारावर नव्हे तर शास्त्रावर आधारित करू. जर आपण आपल्या तारणाच्या खातरीचा पाया देवाच्या वचनाऐवजी केवळ आपल्या अनुभवावर बांधला, तर



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 22 06-08-2025 23:20:05

आपल्या या यात्रा-पंथात आपण स्वतःच शंकांकुशंकाची दारे उघडतो. म्हणून आपल्याला फक्त हळुवार आणि सुखद वाटणारा अनुभव नव्हे, तर तारणाचे खरे आणि वस्तुनिष्ठ ज्ञान मिळवणे अत्यंत आवश्यक आहे.

याच गटातील लोकांना लक्षात घेऊन, पेत्राने विश्वासणाऱ्यांना ताकीद दिली की त्यांनी त्यांचे पाचारण व निवड दृढ करण्यासाठी, किबहूंना त्यांची खातरी करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करावा (2 पेत्र 1:3–11). जे लोक आधीच खातरी बाळगून आहेत, त्यांना असा सल्ला देणे मूर्खपणाचे ठरेल. त्यामुळे पेत्राचे हे शिक्षण सूचित करते की, एखादी व्यक्ती तारणाच्या स्थितीत असू शकते, पण त्याच वेळी ती त्याविषयी खातरीविरहीत असू शकते.

## लोक जे तारलेले नाहीत आणि त्यांना ते माहीत आहे

सिनसिनाटीमध्ये माझी ज्या व्यक्तीशी भेट झाली तो एका विशेष गटाचे मूर्तप्रतिनिधी होता—ज्यांचे तारण झालेले नाही आणि ज्यांना त्या स्थितीची स्पष्ट जाणीव आहे. ही गोष्ट सामान्य विवेकाला अनाकलनीय वाटू शकते. कारण आधुनिक जगात मृत्यू म्हणजे स्वर्गात जाणे, अशी एक फारशी तपासली न गेलेली गृहितकता अनेकांच्या मनात खोलवर रोवलेली आहे. पण पौल, रोमकरांस पत्रात (अध्याय 1), मानवी पतनाच्या खोल गर्तेत डोकावत, अशा लोकांचा स्पष्ट उल्लेख करतो. तो विविध पापांची आणि विकृतींची यादी देतो आणि सांगतो की पतित माणूस केवळ स्वतःच पाप करतो असे नाही, तर जे लोक त्याच्यासारखेच पाप करतात त्यांनाही तो संमती देतो, जरी त्यांनी अशी दुष्कृत्ये करणारे मरणास पात्र आहेत, हे त्यांना ठाऊक आहे (वचन 32).

पौल रोमकरांस पत्र 1 मध्ये जे मांडतो त्यामागे एक मोठा धर्म-सिद्धांत आहे—



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 23 06-08-2025 23:20:05

की मनुष्याला आपली हरवलेली स्थिती समजून घेण्यासाठी त्याला बायबलमधील उपदेश ऐकणे आवश्यकच असते असे नाही. निर्मिलेल्या वस्तूंद्वारे देवाच्या प्रकाशनाच्या माध्यमातून, जेव्हा देव स्वतःचा नियम माणसाच्या अंतःकरणावर लिहितो आणि त्याचं वचन सद्सदविवेकबुद्धीच्या रूपानं मानव-मनात रोवतो, तेव्हा माणसांना समजते की ते आपल्या वागणुकीसाठी दोषी आहेत आणि त्यांच्या निर्माणकर्त्या सोबतचे त्यांचे नाते तुटलेले आहे.

वरवर पाहता, असे बरेच लोक जे आपल्या डोक्यावर देवाच्या क्रोधाचे संकट वावरत असल्याचे नाकारतात; त्यांपैकी काही तर चक्क देवाच्या अस्तित्वालाही नाकारतात. पण बायबल म्हणते, “कोणी पाठीस लागले नसता दुर्जन पळतात” (नीतिसूत्रे 28:1). म्हणजेच, मानवी मुखवट्याच्या आत, त्याच्या उच्चारांपलीकडे, अशा भीतीचा झरा वाहत असतो जो केवळ देवाच्या भीषण उपस्थितीपुढे शुद्ध होतो. म्हणूनच ‘फॉक्सहोल परिवर्तन’ या घटनांचा उगम होतो, जेव्हा लोक त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसांत अचानक गंभीर होतात, पाळक किंवा धर्मगुरूला बोलावतात आणि, आपल्या सार्वकालिक जीवनासाठी काहीतरी विमा-व्यवस्था सुरक्षित करण्याचा प्रयत्न करतात.

तुम्ही कदाचित डब्ल्यू. सी. फील्ड्सची गोष्ट ऐकली असेल. मृत्यूशय्येवर असताना, तो बायबल उघडून काही शोधत होता. ते पाहून त्याला ओळखणाऱ्यांना आश्चर्य वाटले. त्याचा एक मित्र विचारतो, “डब्ल्यू. सी., काय शोधतो आहेस?” त्याने उत्तर दिले, “सुटकेचे मार्ग शोधतोय.” त्याचं हे उत्तर नेहमीसारख्या विनोदी शैलीत असलं, तरी हे स्पष्ट आहे की फील्ड्सला जाणवले होते की तो स्वतःच्या सृष्टीकर्त्याचा सामना करायला जात असताना अत्यंत संकटपूर्ण स्थितीत आहे.

हे विश्वास ठेवणं जितकं कठीण वाटेल, तितकंच हे खरं आहे की काही लोक तारले गेलेले नाहीत आणि त्यांना याची जाणीव आहे. त्यांना माहीत असतं की ते



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 24 06-08-2025 23:20:05

कृपेच्या स्थितीत नाहीत, की देवाबरोबर त्यांची सहभागिता नाही, आणि हे की ते त्याच्यापासून दूर झालेले आहेत. आपण असं म्हणू शकतो की त्यांच्याकडे एक नकारात्मक स्वरूपाची खातरी आहे.

## लोक जे तारलेले नाहीत, परंतु त्यांना ते माहीत नाही

आपल्याला आतापर्यंत जे चित्र दिसते, ते असे आहे: काही लोक आहेत जे तारले गेले आहेत आणि त्यांना याची स्पष्ट जाणीव आहे; काही लोक आहेत जे तारले गेले आहेत पण त्यांना ते माहीत नाही; आणि काही लोक असे आहेत, जे तारले गेलेले नाहीत आणि त्यांना ते माहीत आहे. या सर्व श्रेणी तुलनेनं सहजपणे उलगडून सांगता येण्यासारख्या आहेत.

पण जेव्हा आपण तारणाच्या खातरीचा विषय उकलतो, तेव्हा चौथी श्रेणी हे संपूर्ण चित्र गोंधळात टाकते—असे लोक ज्यांचं तारण झालेलं नाही, परंतु त्यांना वाटते की ते तारलेले आहेत. ही अशा लोकांची जमात आहे, जी कृपेच्या स्थितीत नाही, पण समजते की आपण त्या स्थितीत आहोत. थोडक्यात सांगायचं, तर त्यांना जी आहे ती एक खोटी खातरी.

लिगोनियर मिनिस्ट्रीजने एकदा धर्मसुधारणेच्या इतिहासाशी संबंधित स्थळांचा दौरा आयोजित केला होता. हा दौरा म्हणजे मार्टिन लूथरच्या पदचिन्हांचा पाठपुरावा होता. आम्ही पूर्व युरोप आणि पूर्व जर्मनीमधील त्या शहरांत गेलो, जिथे लूथरणे आपले कार्य केले होते. आम्ही एर्फर्ट, विटेनबर्ग, वॉर्म्स, न्युरेमबर्ग आणि अशा इतर ठिकाणी भेट दिली. एका दिवशी आम्ही एका ठिकाणी भेट दिली आणि नंतर आमच्या जेवणासाठी आम्हाला वेळ होता. दौऱ्यातील लोक वेगवेगळ्या दिशांनी शहरात गेले आणि आम्हाला ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 25 06-08-2025 23:20:05

वेळी पुन्हा एकत्र जमण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. आमच्या गटाने शहरभर भटकंती केली आणि जेवण करून एका उपाहारगृहाबाहेर आला. परंतु जेव्हा आम्ही उपहारगृहातून बाहेर पडलो, तेव्हा आम्हाला परत येण्यासाठी मार्ग आठवत नव्हता.आम्ही एकमेकांना विचारले,"आता बसपर्यंत कसे जायचे?" त्या वेळी आमच्या गटातील एका महिलेने सांगितले, "मला वाट दाखवता येईल." मग ती पुढे सरसावली आणि नगरी-रस्त्यांनी चालायला लागली, आणि आम्ही सर्व तिच्या मागे गेलो. लवकरच जाणवले की आपण चुकीच्या दिशेने चाललो आहोत, आणि मला थोडी काळजी वाटू लागली मी म्हणालो, "वाईट मानू नकोस, मेरी, पण आपण योग्य दिशेने चाललो आहोत का?" ती म्हणाली, "होय, मला खातरी आहे." मला दिलासा वाटला, पण दोनच पावलांनंतर ती वळून म्हणाली, "होय, मी नेहमीच खातरीने सांगते, पण माझे बरोबर असणे हे दुर्मिळच."

जे लोक आपण स्वर्गात जात असल्याचा आत्मविश्वास व्यक्त करतात, ते काहीसे त्या स्त्रीसारखे असतात. त्यांना वाटतं की त्यांना रस्ता माहीत आहे. त्यांना "खातरी" असते की ते ख्रिस्ती आहेत. त्यांच्या तारणाविषयी कोणतीही शंका त्यांना वाटत नाही; ते या प्रश्नाने अस्वस्थ होत नाही. पण खरी समस्या हीच आहे—की त्यांची ही खातरी म्हणजे केवळ एक खोटी खातरी असते.

याच खोट्या खातरीमुळे निर्माण होणारा तणाव आणि चिंता या पुस्तिकेत हाताळण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, विशेषतः जेव्हा आपण गट एक, आणि गट चारची तुलना करतो. गट एक, आणि आपण हे लक्षात ठेवावे, अशा लोकांचा आहे जे तारले गेले आहेत आणि त्यांना त्यांच्या तारणाची खातरी आहे. तर गट चार, हा अशा लोकांचा गट आहे जे तारलेले नाहीत, आणि तरीही स्वतःच्या तारणाची खातरी बाळगून आहेत. आपण जर खऱ्या खातरीचा पाया उभारायचा असेल, तर आपल्याला सर्वप्रथम या खोट्या खातरीच्या मूळ कारणांवर खोलवर विचार करावा लागेल.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 26 06-08-2025 23:20:05

## प्रकरण 3

# खोटी खातरी

आपल्या तारणाविषयी पूर्ण खातरी मिळवण्याचा जो प्रयत्न आहे, त्यात एक महत्त्वाची अडचण आहे—ही अडचण अशी की, दोन अगदी भिन्न प्रकारचे लोक आहेत, ज्यांना ठामपणे खातरी असते की ते तारलेले आहेत.

त्यांच्यात फरक केवळ एवढाच आहे की, त्यांपैकी एक गट भ्रमात पडलेला असतो की आपण तारलेले आहोत. हेच ते लोक आहेत ज्यांचा उल्लेख येशूने डोंगरावरील प्रवचनात केला होता, जे शेवटच्या दिवशी त्याच्याकडे येऊन त्याला "प्रभो, प्रभो" असे म्हणतील. त्यांना पूर्ण खातरी असते की ते त्याचेच आहेत; पण



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 27 06-08-2025 23:20:05

येशू त्यांना नाकारेल आणि त्यांच्या खातरीचं स्वरूप खोटं असल्याचं उघड करेल.

तारणाची खोटी खातरी कशी शक्य होते? लोक अशा खोट्या खातरीपर्यंत पोहोचतात तरी कसे? या प्रकरणात मी याच प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करणार आहे. समस्या अनेक आहेत, पण त्या शेवटी दोन मुख्य प्रकारांमध्ये विभागता येतात. पहिली समस्या, जी या प्रकरणाचा केंद्रबिंदू असेल, ती म्हणजे, तारणाच्या अटींबाबत असलेली चुकीची समज. अनेकदा लोक तारण म्हणजे काय, याविषयी गोंधळलेले असतात. आपण या संदर्भातील तीन मुख्य चुकीच्या समजुती तपासणार आहोत: 1. वैश्विकतारणवाद -म्हणजे शेवटी सर्वांनाच तारण लाभेल असा समज, 2. कर्मनीतिवाद– म्हणजे कट्टर नियमप्रेमी प्रवृत्ती किंवा कट्टर नियमांवर आधारित तारण, आणि 3. धर्म-संस्कारवाद -म्हणजे धार्मिक मध्यस्थांमार्फत मिळणाऱ्या कृपेसंबंधी विविध समजुती. दुसरी अडचण तेव्हा उद्भवते, जेव्हा एखाद्या व्यक्तीला तारण म्हणजे काय याचे योग्य ज्ञान असते, पण त्या अटी आपण पूर्ण केल्या आहेत असं ती समजते—आणि ती समज चुकिची असते. शेवटची दोन प्रकरणं आपल्याला याचं अचूक मूल्यमापन करण्यासाठी साहाय्य करतील—की आपण खरोखर तारणाच्या अटी पूर्ण केल्या आहेत की नाही.

## वैश्विक-तारणवाद

तारणाविषयीची खोटी खातरी निर्माण होण्यामागची पहिली गंभीर चूक म्हणजे वैश्विक-तारणवाद हा समज. हा सिद्धांत असा शिकवतो की शेवटी प्रत्येकजण तारण पावतो आणि स्वर्गात जातो. जर एखाद्या व्यक्तीने या तारणाच्या सिद्धांतावर विश्वास ठेवला, तर एक सरळ तर्कशास्त्रीय युक्तिवाद त्याला या वैश्विक तारणाच्या



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 28 06-08-2025 23:20:05

कल्पनेपासून थेट खातरीच्या निष्कर्षापर्यंत घेऊन जातो:

**युक्तिवाद 1:** प्रत्येक मनुष्य स्वर्गात जातो.

**युक्तिवाद 2:** मी मनुष्य आहे.

**निष्कर्ष:** म्हणून, मी स्वर्गात जाईन.

मंडळीच्या इतिहासातील सर्वात मोठा वाद सोळाव्या शतकात रोमन कॅथलिक मंडळी आणि प्रोटेस्टंट धर्मसुधारक यांच्यात झाला. हा वाद “नीतिमान ठरण्याच्या प्रक्रियेबाबत” होता—म्हणजेच, एखादा पापी मनुष्य नीतिमान कसा ठरतो? खरा मुद्दा असा होता की नीतिमान ठरणं फक्त विश्वासामुळे घडतं की त्यासाठी इतर काही माध्यमं आवश्यक आहेत? पण आजच्या वैचारिक वातावरणात, फक्त विश्वासाने नीतिमान ठरणे हा दृष्टिकोन प्रचलित नाही. त्याऐवजी, “मरणाने नीतिमान ठरणे” ही संकल्पना अधिक व्यापकपणे स्वीकारली गेली आहे, आणि वैश्विक तारणवाद हा विचार या संकल्पनेला बळकटी देतो.

मी आधी “सुवार्ता जागृती चळवळ” या प्रचारपद्धतीतील पहिल्या निदानात्मक प्रश्नाचा थोडक्यात उल्लेख केला होता: “तुमच्या आध्यात्मिक जीवनात तुम्ही त्या टप्प्यावर पोहोचलात का, जिथे तुम्हाला याची खातरी आहे की, जर आज रात्री तुमचा मृत्यू झाला, तर तुम्ही स्वर्गात जाल?” दुसरा निदानात्मक प्रश्न असा आहे: “जर आज रात्री तुम्ही मरण पावलात आणि देवापुढे उभे राहिलात, आणि देव तुम्हाला विचारेल, ‘मी तुला माझ्या स्वर्गात का प्रवेश द्यावा?’ तर तुम्ही काय उत्तर द्याल?”

एकदा, माझा मुलगा लहान असताना मी त्याला हे दोन्ही प्रश्न विचारले. पहिल्या प्रश्नाला त्याने क्षणाचाही विलंब न लावता “होय” असं उत्तर दिलं, हे पाहून मला अत्यंत आनंद झाला. पण दुसरा प्रश्न विचारताच त्याने माझ्याकडे अशा नजरेनं



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 29 06-08-2025 23:20:06

पाहिलं, जणू मी त्याच्या आयुष्यातील सर्वात मूर्खपणाचा प्रश्न विचारला होता. तो म्हणाला, “मी म्हणेन, ‘कारण मी मेलो आहे.’” यापेक्षा सोपं काय असेल? माझा मुलगा बायबल-सम्मत ईश्वरविज्ञान मानणाऱ्या घरात वाढत होता, पण “फक्त विश्वासाने नीतिमान ठरणे (justification by faith alone)” हा तारणाचा मूलभूत सिद्धांत मी त्याला समजावून सांगण्यात अपयशी ठरलो होतो. त्याऐवजी, आपल्या आजच्या संस्कृतीत खोलवर रूजलेल्या या दृष्टिकोनाने त्याला आधीच आपल्या विळख्यात घेतलं होतं—की प्रत्येकजण तारण पावतो, आणि स्वर्गात जाण्यासाठी माणसाने फक्त एकच गोष्ट करायची असते: मरण.

आपल्या ईश्वरविज्ञानातून आपण अंतिम न्यायाचे शिक्षण इतके हद्दपार करून टाकले आहे आणि त्याचबरोबर दैवी शिक्षा—विशेषतः नरकदंड—हे शिक्षण अशा प्रकारे नष्ट केलं आहे, की आज बहुतेकजण हे गृहीत धरतात की स्वर्गात जाण्यासाठी माणसाला फक्त मरण पुरेसं आहे. प्रत्यक्षात, आपल्या संस्कृतीत पवित्रीकरणासाठी सध्याचा सर्वात प्रभावी “कृपेचा मार्ग” म्हणजे मृत्यू. कारण पापाने नीतिभ्रष्ट झालेला पापी, शवागृह आणि स्मशानभूमीच्या मधल्या प्रवासात जणू आपोआपच बदलतो—आणि जेव्हा अंत्यविधी संपन्न होतो, तेव्हा तो मृत व्यक्ती एक सद्गुणी आदर्श म्हणून सादर केला जातो. असं वाटतं की त्या व्यक्तीच्या मृत्यूमुळेच त्याची पापं दूर झालेली असतात. पण ही अत्यंत धोकादायक समजूत आहे, कारण शास्त्र स्पष्टपणे इशारा देतं, की मनुष्याला एकदाच मरण, आणि त्यानंतर न्याय होणे ठरलेले आहे (इब्री. 9:27).

लोकांना असं वाटतं की अंतिम न्यायाचा धोका हा जणू आग आणि गंधकाचा प्रचार करणाऱ्या धर्मप्रसारकांनी निर्माण केलेला प्रकार आहे, जसे की बिली संडे, ड्वाइट एल. मूडी, बिली ग्राहम, जोनाथन एडवर्ड्स आणि जॉर्ज व्हाइटफिल्ड यांसारख्या लोकांनी. पण प्रत्यक्षात, स्वर्ग आणि नरक यांच्यामधील विभाजन आणि अंतिम न्याय याबाबत सर्वाधिक स्पष्टपणे शिकवणारा कोणी असेल, तर



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 30 06-08-2025 23:20:06

तो प्रत्यक्षांत येशूच होता. खरं तर, येशू स्वर्गाविषयी जितक्या प्रमाणात उपदेश दिला, त्यापेक्षा अधिक वेळा त्याने नरकाचा उल्लेख केला, आणि चेतावणी दिली की शेवटच्या दिवशी प्रत्येक अविचारी शब्दाचाही न्याय होईल. पण एक गोष्ट अशी आहे जी तारण न झालेले लोक मानसिक पातळीवर दडपून टाकण्याचा प्रयत्न करतात, ती म्हणजे अंतिम, सर्वसमावेशक न्यायाचा धोका. कारण कोणीही आपल्या पापांसाठी उत्तरदायी ठरू इच्छित नाही. म्हणूनच, वैश्विक तारण—सर्वजण तारण पावतात, ही संकल्पना—मानवाच्या मनाला सर्वात मोहक वाटते.

## कर्मनीतिवाद

खोटी खातरी निर्माण होण्यामागील दुसरी गंभीर चूक म्हणजे कर्मनीतिवाद, ज्याला “कर्मांनी नीतिमान ठरणे” असंही म्हणतात. या विचारधारेनुसार, स्वर्गात जाण्यासाठी देवाच्या नियमशास्त्राचे काटेकोर पालन करणे आणि चांगले जीवन जगणे आवश्यक आहे. म्हणजेच, तुमची चांगली कर्मे तुम्हाला स्वर्गात घेऊन जातात. बरेच लोक, देवाकडून अपेक्षित असलेल्या गोष्टींचा चुकीचा अर्थ लावून, असं समजतात की त्यांनी स्वर्गप्रवेशासाठी देवाने ठरविलेल्या सर्व अटी पूर्ण केल्या आहेत.

मी एकदा सुवार्ता-जागृती *(Evangelism Explosion)* अभियानासाठी प्रशिक्षक म्हणून सेवा बजावत होतो. आठवड्यातून एक किंवा दोन वेळा मी प्रशिक्षणार्थ्यांसोबत समुदायात जात असे, लोकांशी संवाद साधत असे आणि निदानात्मक प्रश्न विचारत असे. नंतर आम्ही मिळालेली सर्व उत्तरं एकत्र करीत असो. त्यापैकी सुमारे 90 टक्के उत्तरं “कर्मांनी नीतिमान ठरणे” या गटात मोडणारी असायची. जेव्हा आम्ही लोकांना विचारलं की जर देव तुम्हाला विचारेल, “मी



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 31 06-08-2025 23:20:06

तुला माझ्या स्वर्गात का प्रवेश द्यावा?" तर तुम्ही काय उत्तर द्याल?—तर बहुतेक लोक म्हणत: "मी चांगले जीवन जगलो आहे," "मी मंडळीला दान दिलं आहे," "मी वेगवेगळ्या सुवार्तिक संस्थेबरोबर सेवा केली आहे," किंवा अशाच स्वरूपाची कारणं देत. त्यांच्या खातरीचा पाया त्यांच्या स्वतःच्या कामगिरीच्या नोंदींवर बांधलेला होता. पण ही एक अत्यंत विनाशकारी गोष्ट आहे. कारण शास्त्र अगदी स्पष्टपणे सांगते की कोणीही मनुष्य नियमशास्त्राच्या कर्मांनी नीतिमान ठरणार नाही (रोम. 3:20; गलती. 3:11).

ज्या व्यक्तीने तारणासंबंधीच्या या खोट्या समजुतीला मूर्त स्वरूप दिलं, तो म्हणजे तो श्रीमंत तरुण अधिकारी, जो येशूच्या पृथ्वीवरील सेवाकाळात त्याला भेटायला आला होता (लूक. 18:18–30). तुम्हाला आठवत असेल की जेव्हा तो श्रीमंत मनुष्य येशूकडे आला, तेव्हा त्याच्या ओठांवर येशूसाठी स्तुतिसुमने होती. त्याने विचारले, "उत्तम गुरूजी, मला सार्वकालिक जीवन वतन मिळावे म्हणून मी कोणते चांगले काम करावे?" तो येशूला तारणासाठी आवश्यक असलेल्या अटी विचारत होता.

येशूने तारणाच्या अटींबाबत उत्तर देण्याआधी, त्याच्या स्तुतीचा प्रतिवाद केला. येशू म्हणाला, "तू मला उत्तम का म्हणतोस? देवाशिवाय कोणीही उत्तम नाही." (वचन 19). काही टीकाकार असा युक्तिवाद करतात की येशूने असे बोलून त्याचे चांगुलपण आणि देवत्व नाकारले. पण तसे नाही. येशूला चांगल माहीत होत की हा मनुष्य ज्याच्याशी तो बोलत आहे त्याचे त्याला अजिबात ज्ञान नव्हते. त्याला माहीत नव्हतं की तो देहधारण करून आलेल्या देवाशी संवाद साधत आहे. त्याला एवढंच ठाऊक होतं की तो एका प्रवासी गुरूला (रब्बीला) एक धार्मिक प्रश्न विचारत आहे. पण येशूचं खरे स्वरूप हे त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी मुख्य मुद्दा होता. म्हणून येशू म्हणाला, "तू मला उत्तम का म्हणतोस? तू स्तोत्र. 14:3 वाचले नाही का? "ते सर्व मार्गभ्रष्ट झाले आहेत; एकूणएक बिघडला आहे, सत्कर्म करणारा कोणी नाही,



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 32 06-08-2025 23:20:06

एकही नाही."

हे सगळं गोंधळात टाकणारं वाटतं का? कारण शेवटी आपण पाहतो की जे लोक देवावर विश्वास ठेवत नाहीत, तेही अनेकदा चांगली कामं करताना दिसतात. पण "उत्तम" या शब्दाचा नेमका अर्थ काय? बायबलनुसार, "उत्तम" या तत्वाचं अंतिम मानक म्हणजे देवाचं नीतिमत्व—आणि आपला न्याय हा केवळ देवाच्या नियमाशी आपल्या बाह्य वर्तनाची सुसंगती पाहूनच केला जात नाही, तर त्या नियमाचं पालन करण्याची आपल्या अंतःकरणातील प्रेरणा काय आहे, ह्यावरूनही केला जातो.

माझ्या आजूबाजूला मला अनेक असे लोक दिसतात जे विश्वासात नाहीत, परंतु तरी जॉन कॅल्विन यांनी ज्याला "सामाजिक सद्गुण" म्हटलं आहे, ते ते प्रत्यक्षात आचरणात आणतात; ते समाजात अनेक चांगल्या गोष्टी करतात, ते त्यांच्या संपत्तीचा उपयोग चांगल्या कारणांसाठी करतात, गरीबांना मदत करतात, आणि काही वेळा इतरांसाठी स्वतःचं बलिदानही देतात. ते परस्पर पातळीवर, म्हणजे इतर माणसांशी, अनेक सत्कृत्ये करतात, पण यांपैकी कोणत्याच गोष्टी त्यांच्या अंतःकरणातील शुद्ध आणि परिपूर्ण देवप्रीतीमुळे उद्भवलेल्या नसतात. यामध्ये जॉनाथन एडवर्ड्स यांनी म्हटलेलं "दर्शनी सद्गुणामागील आत्मकेन्द्रित प्रेरणा" किंवा "उन्नत स्वार्थबुद्धी" हे तत्त्व कार्यरत असू शकतं, पण सरतेशेवटी ती स्वार्थवृत्तीच आहे.

एकदा मी एका भीषण आगीच्या दुर्घटनेची गोष्ट ऐकली होती. एका इमारतीला भयानक आग लागली होती आणि आत अडकलेल्या लोकांना वाचवण्यासाठी सर्वांची धडपड सुरू झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आत जाऊन शक्य तितक्या लोकांना सुरक्षित बाहेर काढलं, पण काही वेळातच पुन्हा आत शिरणं जीवघेणं ठरेल,  हे स्पष्ट झालं. नंतर त्यांना समजले की इमारतीत एक लहान मूल अडकले आहे. गर्दीतील एक मनुष्य कोणताही विचार न करता धोक्याकडे दुर्लक्ष



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 33 06-08-2025 23:20:06

करून धावत इमारतीत शिरला. रस्त्यावर उभ्या असलेल्या लोकांनी त्याचे शौर्य पाहून टाळ्यांचा जल्लोष केला. काही क्षणांत तो जिवंत आणि सुरक्षितपणे बाहेर आला—त्याच्या हातात एक गाठोडं होतं. लोकांचा आनंद द्विगुणित झाला, कारण त्यांना वाटलं की त्याने त्या लहान मुलाला वाचवलं आहे. पण क्षणभरातच सत्य समोर आलं : त्याने आपल्या आयुष्यभराची बचत बाहेर काढली होती आणि ते मूल आतच मरायला सोडून दिलं होतं.

माझ्या मते, एखादा अविश्वासी माणूसही एखाद्या मुलाला वाचवण्यासाठी, अगदी आपल्या जीवाचा विचारही न करता, संकटात उडी घेऊ शकतो. अशा कृती ही स्वाभाविक संवेदनेने प्रेरित एक सामाजिक सद्गुण असू शकतो. परंतु, असा बाह्य सद्गुण आपल्याला देवाच्या न्यायातून निभावून नेण्यासाठी पुरेसा ठरणार नाही.

देव जेव्हा एखाद्या मानवी कृतीकडे पाहतो, तेव्हा तो विचारतो—“ही कृती खरंच माझ्यावर संपूर्ण प्रेम करणाऱ्या अंतःकरणातून उद्भवलेली आहे का?” येशूची आज्ञा स्मरण करा: “तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण शक्तीने व संपूर्ण बुद्धीने ‘प्रीती कर;’ आणि ‘जशी आपणावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर.” (लूक. 10:27). यास्तव, जर कोणी केवळ बाह्यरूपाने नियमांचे पालन करत असेल, पण त्याचं अंतःकरण पूर्णपणे देवासाठी समर्पित नसेल, तर अशा व्यक्तीच्या सद्गुणालाही पापाचा डाग लागलेला असतो. म्हणूनच ऑगस्टीन असे म्हणतात की आपले सर्वोत्कृष्ट सद्गुण हे वास्तवात फक्त एक तेजस्वी दुर्गुण असतात. जोपर्यंत आपण या मर्त्य देहात आहोत, तोपर्यंत पाप आपल्या प्रत्येक कृतीला कलंकित करतच राहील. आणि हेच तर श्रीमंत तरुण अधिकाऱ्याला उमगले नव्हते. त्याला वाटत होतं की त्याने देवाने लाऊन दिलेल्या नीतीमत्तेचा परमोच्च मानक साध्य केला आहे.

पौल नवीन करारामध्ये स्पष्ट चेतावणी देतो की, “जे स्वतःहून स्वतःचा न्याय



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 34 06-08-2025 23:20:06

करतात, ते शहाणे नसतात" (1 करिंथ. 10:12). आपण एकमेकांच्या आचरणाकडे पाहून असा निष्कर्ष काढतो की जर आपण व्यभिचार, खून, अपहार किंवा इतर एखाद्या भीषण पापापासून स्वतःला अलिप्त ठेवलं, तर आपण बरंच काही साध्य केलं आहे. कारण आपल्यापेक्षा अधिक पापी लोक सहजपणे दिसतात, आणि त्यामुळे आपलं स्वतःचं जीवन बऱ्याचपैकी शुद्ध आहे, अशा समजुतीला आपण खतपाणी घालतो.

अशीच मानसिकता येशूकडे आलेल्या त्या श्रीमंत तरुण अधिकाऱ्याची होती. त्याला वाटत होतं की येशू एक उत्तम मनुष्य आहे. परंतु येशूने त्याला थांबवत, नियमशास्त्राची आठवण करून दिली: "तुला आज्ञा ठाऊक आहेत : 'व्यभिचार करू नकोस, खून करू नकोस, चोरी करू नकोस, खोटी साक्ष देऊ नकोस, आपल्या बापाचा व आईचा सन्मान कर.' (वचन 20). त्यावरून त्या मनुष्याच्या अंतःकरणात नियमशास्त्राविषयी असलेली वरकरणी समज समोर आली. तो म्हणाला, "मी आपल्या तरुणपणापासून ह्या सर्व पाळत आलो आहे." (वचन 21). दुसऱ्या शब्दांत सांगायचं झालं, तर तो म्हणत होता की त्याने आयुष्यभर दहा आज्ञा पाळल्या आहेत.

येशू तेव्हा असं म्हणू शकला असता, "बरं, मला दिसतंय की तू 'डोंगरावरील उपदेशा'ला अनुपस्थित होतास—जिथं मी या आज्ञांचा खऱ्या, आंतरिक अर्थाचा उलगडा केला होता. तू तो धडा चुकवलास." किंवा त्याने सरळ सांगितलं असतं, "तू आज सकाळपासूनच या आज्ञा पाळलेल्या नाहीस." पण येशूने त्याऐवजी अत्यंत प्रभावी शिक्षणपद्धतीचा वापर करून त्या व्यक्तीच्या समजुतीतील फसवा आधार उघड केला. तो म्हणाला, ""'अद्यापि तुझ्यात एक गोष्ट उणी आहे; तुझे असेलनसेल ते विकून गोरगरिबांना वाटून टाक म्हणजे तुला स्वर्गात संपत्ती मिळेल; आणि चल, माझ्यामागे ये." (वचन 22).



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 35 06-08-2025 23:20:06

येशू या वेळी तारणाचा काही नवीन मार्ग शिकवत नव्हता. त्याचा उद्देश असा नव्हता की मनुष्य गोरगरिबांना आपली संपत्ती दान करून तारण प्राप्त करू शकतो. त्याने लोकांना आपल्या वैयक्तिक मालमत्तेचा त्याग करावा असा सार्वत्रिक आदेश दिला नव्हता. तो एका विशिष्ट व्यक्तीच्या वृत्तीला उघडं पाडत होता, अशा एका श्रीमंत मनुष्याच्या अंतःप्रवृत्तींशी सामना करत होता, ज्याचं अंतःकरण पूर्णपणे त्याच्या संपत्तीने जखडून ठेवलं होतं. त्याचं धनच त्याचा देव बनलं होतं—एक मूर्त स्वरूपात वर्चस्व गाजवणारा देव. प्रत्यक्षात, येशू त्याला म्हणत होता, “तू म्हणतोस की तू दहा आज्ञा पाळल्या आहेत. ठीक आहे, तर पहिलीच आज्ञा पाहूया—‘माझ्याशिवाय तुला दुसरे कोणीही देव नसावेत’ (निर्गम 20:3). जा, तुझं सर्व काही विक आणि गरिबांना वाटून टाक.” त्या क्षणी, जो माणूस काही क्षणांपूर्वी अत्यंत उत्साहाने भरलेला होता, तो शांतपणे डोकं हलवू लागला—कारण त्याचं मन त्या मालमत्तेने व्यापलेलं होतं. आणि तो दुःखी होऊन निघून गेला, कारण त्याच्याकडे पुष्कळ मालमत्ता होती (वचन 23).

ही संपूर्ण भेटच चांगुलपणाविषयी होती. आपण पवित्र देवाच्या मागण्या पूर्ण करण्याइतके चांगले, इतके नीतिमान आहोत का? नवीन कराराच्या प्रत्येक पानावर ही सत्यवाणी प्रकट होते की, आमची सर्व नीतीची कृत्ये घाणेरड्या वस्त्रांसारखी झाली आहेत (यशया 64:6). जो मनुष्य आपल्या स्वतःच्या नीतिमत्तेवर तारणासाठी विश्वास ठेवतो, त्याला एक **खोटी खातरी** लाभते—एक अशी खातरी जी त्याच्या आत्म्याला फसवते. कारण तारण प्राप्त होईल इतपत काहीही आपण करु शकत नाही. आपण केवळ निरुपयोगी दास आहोत (लूक 17:10).



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 36 06-08-2025 23:20:06

## धर्म-संस्कारवाद

तिसरी सामान्य चूक जी खोट्या खातरीला जन्म देते ती म्हणजे “धर्म-संस्कारवाद.” ह्या दृष्टिकोनानुसार तारण हे धर्मगुरूंच्या मध्यस्थीने, पवित्र विधींच्या आचरणाद्वारे, किंवा चर्चच्या माध्यमातून साध्य होते. असे लोक बाप्तिस्मा, प्रभूभोजन किंवा इतर विधींकडे निर्देश करीत असे म्हणतात, “पहा, मी हे धर्मविधी किंवा संस्कार पूर्ण केले आहेत, जे कृपेची साधनं आहेत. मी हे विधी अनुभवल्यामुळे मला माझ्या तारणाची खातरी आहे.”

हीच चूक पवित्रशास्त्रकाळातील परुश्यांनी केली होती. त्यांनी असा गृहीतार्थ लावला होता की, कारण त्यांनी सुंता केली आहे, म्हणून देवाच्या राज्यात आपले स्थान निश्चित झाले आहे. धर्म-संस्कार किंवा निश्चितच महत्त्वाचे आहेत. ते आपल्या तारणासाठी देवाची अभिवचने आपल्यापर्यंत पोहोचवतात. शिवाय, ते आपल्या ख्रिस्ती जीवनात कृपेची साधनं म्हणून कार्य करतात. पण अशा कोणत्याही विधीमुळे आजपर्यंत एकाही व्यक्तीचे तारण झालेले नाही. आणि जो कोणी या विधींवर आपल्या तारणाच्या खातरीचा पाया बांधतो, तो खोटी खातरी बाळगून आहे, कारण तो अशा गोष्टीवर विश्वास ठेवतो जी स्वतः तारण करू शकत नाही आणि ज्यामध्ये तारण करण्याचे सामर्थ्यही नाही.

ह्याच चुकीच्या गृहितकाशी अतिशय जवळून संबंधित आहे एक दुसरा गृहितक—जो अनेक लोक बाळगतात—की तारण मिळवण्यासाठी केवळ चर्चचा सदस्य होणं पुरेसं आहे. त्यांना वाटतं की मंडळीचे सभासद झाल्याने त्यांनी ख्रिस्ताच्या दृश्यमान शरीरात आपलं स्थान मिळवलं, आणि त्यामुळे आपसूकच ते अदृश्य मंडळीचाही भाग बनले आहेत. म्हणून त्यांचा आत्मविश्वास त्यांच्या चर्च सदस्यत्वावर टिकलेला असतो. पण कुणाचंही चर्च सदस्यत्व त्याला नीतिमान ठरवत नाही; ही तारणाची

आणखी एक अशास्त्रीय आणि खोटी पद्धत आहे.

शेवटी, तथाकथित सुवार्तावादी जगात, आपल्याला खोटी खातरी निर्माण करणारे काही इतर स्रोतही दिसून येतात, उदाहरणार्थ, “पाप्याची प्रार्थना” म्हणणे, सुवार्ता प्रचाराच्या सभेत हात वर करणे, पुल्पिट किंवा जिथे प्रचारक उभा असतो तिथे चालत जाणे, किंवा येशूसाठी एक वैयक्तिक निर्णय घेणे. या सर्व पद्धती आणि तंत्रे लोकांना पश्चात्ताप आणि विश्वासाकडे बोलावण्यासाठी वापरली जातात. पण धोका हा आहे की, जे लोक ही प्रार्थना करतात, हात वर करतात, पुल्पिटकडे पुढे चालत जातात किंवा निर्णय घेतात, ते कधी कधी त्या विशिष्ट कृतीवरच आपला विश्वास ठेवून बसतात. मात्र, अशी बाह्यस्वरूपाची कबुली अनेकदा फसवणूक करणारी ठरते. एखादी व्यक्ती सार्वजनिकरित्या काही कबुली देऊ शकते, पण तिच्या अंतःकरणात तारणाची खरी वास्तविकता अस्तित्वातच नसते.

तुम्ही पाहू शकता की, असे अनेक मार्ग आहेत ज्याद्वारे खोटी खातरी मिळू शकते. पुढील प्रकरणात आपण पाहणार आहोत की या बनावट खात्ऱ्या टाळण्याचे आणि त्यावर मात करण्याचे कोणकोणते योग्य मार्ग आहेत. त्याचबरोबर आपण अशा खातरीच्या बायबल-सम्मत, खऱ्या आणि वैध पद्धतींचा शोध घेण्यास प्रारंभ करणार आहोत.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 38 06-08-2025 23:20:06

## प्रकरण 4

# तारणाची खातरजमा करणे

जेव्हा मी थिऑलॉजिकल सेमिनरीत शिक्षण घेत होतो, तेव्हा माझ्या एका सहभ्यासीने विद्यार्थ्यांमध्ये आणि प्राध्यापकांमध्ये “तुम्हाला तुमच्या तारणाची खातरी आहे का?” या प्रश्नावर आधारित एक सर्वेक्षण घेतले. त्या सर्वेक्षणातील उत्तर देणाऱ्या नव्वद टक्क्यांहून अधिक लोकांनी सांगितले की, त्यांना त्यांच्या तारणाची खातरी नव्हती. यापेक्षा अधिक धक्कादायक गोष्ट म्हणजे, त्यांना असे वाटत होते की जो कोणी असे म्हणतो की त्याला त्याच्या तारणाची खातरी आहे, त्याच्यासाठी हा गर्विष्ठपणाच ठरेल. त्यांच्या दृष्टिकोनातून, तारणाची खातरी बाळगणे म्हणजे सद्गुण नव्हे, तर दुर्गुण होता. तारणाच्या खातरीचा शोध म्हणजे



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 39 06-08-2025 23:20:06

मुळात त्यांच्या दृष्टीने एक नकारात्मक प्रवृत्ती होती, कारण त्यांच्या समजुतीनुसार असा शोध हा माणसाला गर्वाच्या अवस्थेत घेऊन जातो.

नक्कीच, ज्या गोष्टीचे आपल्याकडे अस्तित्वच नाही, तिची खातरी बाळगणे याहून मोठा गर्व दुसरा कोणताही असू शकत नाही. जर आपण तारणाच्या स्थितीत नसताना आपल्या तारणाची निश्चित खातरी बाळगत असू, तर ते निखालस गर्विष्ठपणाचे लक्षण आहे. पण दुसरीकडे, जर आपण असे म्हणतो की तारणाची खातरी मिळवणेच शक्य नाही, तर आपण साक्षात देवाच्या विश्वासूपणावरच प्रश्नचिन्ह उभे  करतो. जर तारणाची खातरजमा करणे हे शक्य असेल, आणि तरीही आपण तिचा शोध घेत नाही, तर अशी मानसिकता देखील एक प्रकारचा गर्विष्ठपणाच ठरतो.

तारणाची खोटी खातरी कुठून निर्माण होते याचा विचार करताना, आपण पाहिले की सर्वांत गंभीर अडथळ्यांपैकी एक म्हणजे,  तारणप्राप्तीसाठी आवश्य काय आहे याविषयी असलेला चुकीचा समज. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, चुकीच्या ईश्वरज्ञानामुळे खोटी खातरी निर्माण होऊ शकते. याच्या उलट, शुद्ध व बायबल-सम्मत ईश्वरविज्ञान खरी खातरी उत्पन्न करते. म्हणूनच आपण तारणाची खरी व ठोस खातरी कशी मिळवता येईल याचा शोध सुरू करत असताना, सर्वप्रथम आपण आपली दृष्टी ईश्वरविज्ञानाकडे वळली पाहिजे.

## खातरजमा करण्याची आज्ञा

शास्त्रात तारणाची खातरी मिळवण्याच्या संदर्भात एक अत्यंत महत्त्वाचा शास्त्रभाग म्हणजे 2 पेत्र 1:10-11. तिथे आपण वाचतो:



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 40 06-08-2025 23:20:06

> “म्हणून बंधूंनो, तुम्हांला झालेले पाचारण व तुमची निवड दृढ करण्यासाठी विशेष प्रयत्न करा असे तुम्ही केल्यास तुमचे पतन कधीही होणार नाही; आणि अशा प्रकारे आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त ह्याच्या सार्वकालिक राज्यात जयोत्सवाने तुमचा प्रवेश होईल.”

येथे प्रेषिताचे आदेश काही अंधुक, द्विधा स्वरूपाचे नाहीत; तो आपल्याला स्पष्टपणे सांगतो की, आपण आपली निवड दृढ करण्यासाठी विशेष प्रयत्न करावा, परंतु एखाद्या निष्काळजी, बिनधास्त वृत्तीने नव्हे. उलट, ती खातरी प्रामाणिक आणि चिकाटीने केलेल्या तपासणीतून मिळवली पाहिजे. प्रेषित सांगतो की हे अत्यंत महत्त्वाचे आहे, आणि त्यासोबतच, आपली निवड आणि पाचारण दृढ करण्यासाठी आपण का प्रामाणिक राहिले पाहिजे, याची व्यावहारिक कारणेही तो पुढे मांडतो.

पेत्राला “निवड” या सिद्धांताबद्दल विशेष कळकळ आहे. त्याचे पहिले पत्र “निवडलेले जे परदेशवासी आहेत” (1 पेत्र. 1:1) अशा लोकांस उद्देशून लिहिलेले आहे. त्याने निवडलेल्यांनाच उद्देशून लिहिले, आणि त्यांना हे शिकवले की निवडलेले असल्याचा अर्थ काय आहे. आपल्या आध्यात्मिक प्रवासात ही निवड कोणत्या रूपात प्रकट होते, हे पेत्र समजावून सांगतो. म्हणूनच, जेव्हा दुसऱ्या पत्रात तो त्याच लोकांशी पुन्हा संवाद साधतो, तेव्हा तो त्यांना आठवण करून देतो की आपली निवड दृढ करणे किती महत्त्वाचे आहे.

पेत्राने “निवड” या शब्दाचा उल्लेख केल्यामागे फार खोल अर्थ दडलेला आहे, कारण येथेच आपण ईश्वरविज्ञानाच्या दारातून आत प्रवेश करतो. अनेक लोक निवडीच्या सिद्धांतावर विश्वास ठेवत नाहीत; ते विसरून जातात की हा सिद्धांत बायबल-सुसंगत आहे. काहीजण विचारतात, “तुम्ही हे कसे माहीत कराल की तुम्ही निवडलेले आहात की नाही?” जे लोक निवडीच्या या बायबल-सम्मत सुशिक्षणाशी



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 41 06-08-2025 23:20:06

झुंज देत आहेत त्यांना मी सांगतो, की ख्रिस्ती जीवनात याहून अधिक महत्त्वाचा प्रश्न दुसरा कोणताही नाही. आपण निवडलेल्या लोकांमध्ये गणले गेलेलो आहोत की नाही, याचे उत्तर मिळवणे अत्यंत गरजेचे आहे. जर निवडीचा योग्य अर्थ आपल्याला उमगलेला असेल, आणि आपण निवडलेल्यांमध्येच गणले गेलो आहोत, याची खातरी  असेल, तर अशा ज्ञानामध्ये एक विलक्षण विसावा आहे, विशेषतः जेव्हा आपण भीत व कापत आपले तारण साधून घेत असतो (फिलिप्पै. 2:12), आणि जेव्हा ख्रिस्ती जीवनात अनेक संकटांच्या खाचखळग्यांतून आपल्याला जावे लागते (2 तिमथ्य. 1:12 ).

2 तिमथ्य. 1:12  मध्ये, पौल लिहितो: "ह्या कारणाने ही दुःखे मी सोसत आहे, तरी मी लाज धरत नाही; कारण मी ज्याच्यावर विश्वास ठेवला आहे त्याला मी जाणतो; आणि माझी ठेव त्या दिवसासाठी राखण्यास तो शक्तिमान आहे, असा माझा भरवसा आहे." येथे पौल आपल्या स्वतःच्या भविष्याबाबतच्या खातरी बद्दल बोलतो, कारण त्याला हे ठाऊक आहे की त्याने आपला विश्वास कोणावर ठेवला आहे. तो सांगतो की, शर्यतीच्या शेवटपर्यंत टिकून राहण्यासाठी त्याचा भर स्वतःच्या सामर्थ्यावर नाही. उलट, त्याचा भर ज्याच्यावर त्याने विश्वास ठेवला आहे, त्या व्यक्तीच्या सामर्थ्यावर आहे, जो त्याला अखेरपर्यंत राखू शकतो, ही त्याची खातरी  आहे. हीच ती निवडीची निश्चितता आहे, ज्याच्या शोधात प्रेषित पेत्र आपल्याला संपूर्ण चिकाटीने लागावं, असं सांगतो.

जर आपल्याला आपली निवड दृढ करण्यासाठी बोलावले गेले असेल, तर मग आपल्याला ती निवड दृढ करता येते, हे उघडच आहे. आपण निवडलेल्यांमध्ये आहोत की नाही, हे आपल्याला जाणून घेता येते. त्यामुळे, आपली खातरी शेवटच्या श्वासापर्यंत टाळत राहणे ही गोष्ट बायबलसुसंगत नाही. आपल्याला ही खातरी आताच, काटेकोरपणे शोधायला हवी. आपली निवड दृढ झाली आहे, आपण देवाच्या राज्यात आहोत, आपल्याला पित्याच्या कुटुंबात दत्तक घेण्यात



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 42 06-08-2025 23:20:06

आले आहे, आपण खऱ्या अर्थाने ख्रिस्तामध्ये आहोत आणि ख्रिस्त आपल्यामध्ये आहे, या सर्व गोष्टींची आपल्याला खातरजमा करावीच लागेल. पण ही खातरजमा आपण करावी कशी? यासाठीचा अत्यंत महत्त्वाचा पहिला टप्पा म्हणजे : निवडीच्या सिद्धांताचा अचूक आणि खोलवर अर्थ समजून घेणे.

## भविष्य-दर्शक पूर्वज्ञानावर आधारित निवड

जसं मी यापूर्वी नमूद केलं, सध्याच्या काळात बरेच लोक देवाच्या निवडीच्या धर्म-सिद्धांताविषयी प्रतिकूल भावना बाळगतात, आणि नंतर हाच प्रतिकूल समज निवडीच्या स्वरूपासंबंधी अनेक वेगवेगळ्या दृष्टिकोनांचा उगमस्थानं ठरला आहे. उदाहरणार्थ, काही लोक असं मानतात की आपल्या तारणावरच आपली निवड आधारलेली आहे. या दृष्टिकोनात तारण, एका अर्थाने, निवडीच्या आधी येते. या मतप्रवाहाला आपण भविष्य-दर्शक पूर्वज्ञानावर आधारित निवड, किंवा देवाने घेतलेल्या भविष्याच्या पूर्वदृष्टीवर आधारित निवडीचा दृष्टिकोन असं म्हणतो.

या दृष्टिकोनाचे समर्थक असं गृहीत धरतात की, जे लोक तारणदायी विश्वास व्यक्त करतात, त्यांनाच देव तारणासाठी निवडतो. त्याच्या भविष्य-दर्शक पूर्वज्ञानाच्या आधारे, देव काळाच्या व्हरांड्यातून पाहतो आणि कोण सुवार्तेच्या आवाहनाला होकार देतील आणि कोण नकार देतील, हे तो अगोदरच पाहतो. लोक सुवार्तेला काय प्रतिसाद देतील याच्या आधीच मिळालेल्या ज्ञानाच्या आधारावर, देव आपला निवडीचा संकल्प निश्चित करतो. म्हणजेच, जेव्हा तो एखाद्याला विश्वास दाखवताना आणि तारणाच्या अवस्थेत प्रवेश करताना पाहतो, तेव्हा त्याला तो त्या आधारावर निवडतो.

परंतु मला पूर्ण खातरी आहे की, निवडीचा हा दृष्टिकोन बायबलशी सुसंगत नाही,



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 43 06-08-2025 23:20:06

आणि तो खऱ्या अर्थाने बायबल शिकवणुकीचे स्पष्टीकरणही देत नाही. उलट, हा दृष्टिकोन मुळात बायबलमधील शिकवणीला नाकारतो. मी हे का म्हणतो? कारण 'भविष्य-दर्शक' या अर्थाने देवाच्या पूर्वज्ञानाची व्याख्या करणारा हा दृष्टिकोन असा ग्रह धरतो की तारणाचे अंतिम यश हे देवाच्या कृपेने आणि दयेने नसून, ते मर्त्य मनुष्य स्वतः काय करतो यानुसार साध्य होते (म्हणजे देवाची कृपा आणि दया बाजूला सारून माणसाच्या कृतीला अंतिम अधिकार दिला जातो). आणि मला वाटतं की जे लोक निवडीच्या या 'भविष्य-दर्शक' पूर्वज्ञानाधिष्ठित मताला स्वीकारतात, ते कायमच त्यांच्या तारणाच्या खातरीच्या बाबतीत संघर्ष करीत राहतात, कारण त्यांची खातरी शेवटी त्यांच्या कृतीवर, त्यांच्या कर्मांवर आधारित असते.

पवित्र शास्त्रांनुसार, निवड ही तारणासाठीच असते. या दृष्टिकोनानुसार, जर तुम्ही निवडले गेले असाल तर तुमचे तारण निश्चित होईलच, आणि जर तुमचे तारण झाले असेल, तर ते तुम्ही निवडलेल्यांमध्ये आहात याचं स्पष्ट लक्षण आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचं झाल तर: ज्या कोणाला तारण-प्राप्ती झाली आहे, अशांपैकी कोणीही निवडलेले नाहीत, असं कधी होत नाही; आणि जे निवडलेले आहेत, त्यांना तारण-प्राप्ती होणार नाही, असही होत नाही. तारण-प्राप्ती ही निवडीतूनच येते. म्हणून, जर आपल्याला आपल्या तारणाबद्दल खातरी हवी असेल, तर आपण निवडलेल्यांमध्ये आहोत की नाही, हे आपल्याला जाणून घ्यावच लागेल.

पेत्राच्या शिकवणीतून आपल्याला स्पष्ट दिसतं की आपलं पाचारण आणि आपली निवड ही दृढ करणं इतकं महत्त्वाचं का आहे. जर आपल्याला ही खातरी झाली की आपण निवडलेल्यांपैकीच आहोत, तर आपल्याला आपल्या तारणाविषयी—फक्त आजपुरतीच नव्हे, तर भविष्यासाठी देखील—एक दृढ निश्चितता प्राप्त होते. हे खरं आहे, कारण निवड ही केवळ तारणाची शक्यता तयार करत नाही, तर ती निवडलेल्यांच्या तारणाची हमी देते. दुसऱ्या अर्थानं सांगायचं झालं, तर निवडले



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 44 06-08-2025 23:20:06

जाण्यामागे देवाने जो संकल्प केला आहे तो म्हणजे—निवडलेल्यांचे तारण करणे. आणि त्याचा हा संकल्प कुठल्याही परिस्थितीत निष्फळ होणार नाही.

एक शास्त्रवचन आहे, जे मला आतून एक गहन आश्वासन आणि धीर प्राप्त करून देते, जरी या संदर्भात त्याचा सहसा उल्लेख केला जात नाही. हे वचन योहानाच्या शुभवर्तमानात सापडतं, येशू आपल्या शिष्यांसाठी आणि भावी पिढ्यांतील त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी जी महायाजकीय प्रार्थना करतो त्या भागामध्ये. खरं तर, शतकानुशतकं मंडळीसाठी हे वचन आश्वासक प्रेरणाच ठरलेलं आहे. येशू म्हणतो:

> ‘जे लोक तू मला जगातून दिलेस त्यांना मी तुझे नाव प्रकट केले; ते तुझे होते व तू ते मला दिलेस; व त्यांनी तुझे वचन पाळले आहे आता त्यांना समजले आहे की, जे काही तू मला दिले आहेस ते सर्व तुझ्यापासून आहे कारण जी वचने तू मला दिलीस ती मी त्यांना दिली आहेत; ती त्यांनी स्वीकारली; मी तुझ्यापासून आलो हे त्यांनी खरोखर ओळखले व तू मला पाठवलेस असा त्यांनी विश्वास ठेवला त्यांच्यासाठी मी विनंती करतो; मी जगासाठी विनंती करत नाही, तर जे तू मला दिले आहेत त्यांच्यासाठी; कारण ते तुझे आहेत जे माझे ते सर्व तुझे आहे, व जे तुझे ते माझे आहे, व त्यांच्या ठायी माझा गौरव झाला आहे ह्यापुढे मी जगात नाही, पण ते जगात आहेत व मी तुझ्याकडे येत आहे हे पवित्र पित्या, तू मला दिलेल्या तुझ्या नावात त्यांना राख, ह्यासाठी की, जसे आपण एक आहोत तसे त्यांनी एक व्हावे जोपर्यंत मी जगात त्यांच्याबरोबर होतो तोपर्यंत तू मला दिलेल्या तुझ्या नावात मी त्यांना राखले; मी त्यांचा सांभाळ केला, व नाशाच्या पुत्राशिवाय त्यांच्यातून कोणाचा नाश झाला नाही; शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून असे झाले‘ (योहान. 17:6-12).



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 45 06-08-2025 23:20:06

या प्रार्थनेत येशू असं म्हणतो की पित्याने काही विशिष्ट लोकांचा समूह त्याला दिला आहे. हे लोक पुत्राने मुक्त केले आहेत, कारण पिता जे जे लोक पुत्राला देतो, ते सर्व पुत्राकडे येतात आणि पुत्र त्यांना राखतो (योहान. 6:37, 39–40, 44). जेव्हा येशू पित्याने त्याला दिलेल्या लोकांबद्दल बोलतो, तेव्हा तो निवडलेल्यांचा उल्लेख करतो. जे निवडलेले आहेत, आणि जे पिता पुत्राला देतो, त्यांना पुत्र राखून ठेवतो. हीच आपल्या तारणाची खरी खातरी असण्याची मूळ पायाभूत गोष्ट आहे—आपली स्वतःची विश्वासाची चिकाटी किंवा धीर नव्हे.

आपण पवित्रजनांचे विश्वासात टिकून राहण्याविषयी बोलतो, आणि मला विश्वास आहे की पवित्र लोक नक्कीच विश्वासात टिकून राहतात, पण त्यांचं टिकून राहणं हे या गोष्टीमुळे आहे की देव स्वतः त्यांना राखतो. म्हणून, “पवित्रजनांची विश्वासाची चिकाटी” असे म्हणण्यापेक्षा “ पवित्रजनांची राखण” असे म्हणणे हे अधिक बायबल-सम्मत आणि तात्त्विक दृष्टिकोनाने समृद्ध आहे. आपण हेच येशूच्या त्या विनंतीत ऐकतो, जिथं तो पित्याला विनवणी करतो, की त्याने जे लोक येशूला दिले, त्यांना त्याने आपल्या नावात राखावे.

## तारणाचा क्रम (ऑर्डो सॅल्युटिस)

जेव्हा आपण निवड आणि तारण यांच्यातील संबंधाचा अधिक खोलवर विचार करतो, तेव्हा ईश्वरविज्ञानानुसार ज्याला ‘ऑर्डो सल्यूटिस’ म्हणजेच तारणाचा क्रम म्हणतात त्याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. हा क्रम त्या घटनांच्या तर्कशुद्ध अनुक्रमाशी संबंधित असतो, ज्या आपल्या तारणाकडे नेतात, आणि तो कालानुक्रम नसतो, तर तात्त्विक दृष्टिकोनातून सुसंगत असलेला क्रम असतो.

हा फरक नेमका काय आहे, हे मी स्पष्ट करू इच्छितो. आपण असं मानतो की



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 46 06-08-2025 23:20:06

आपण केवळ विश्वासाद्वारे नीतिमान ठरतो. पण, जेव्हा एखाद्याच्या मनात खरा तारणदायी विश्वास उत्पन्न होतो, त्यानंतर किती वेळात तो नीतिमान ठरतो? पाच सेकंदांनी? पाच मिनिटांनी? पाच महिन्यांनी? की पाच वर्षांनी? नाही. आपण असं म्हणतो की नीतिमान ठरणं आणि विश्वास येणं ही दोन्ही क्रियाविशेषे वेळेच्या दृष्टीने एकाच क्षणी घडतात. म्हणजे, ज्या क्षणी आपल्याला खरा विश्वास प्राप्त होतो, त्याच क्षणी देव आपल्याला नीतिमान म्हणून स्वीकारतो. तरीही आपण असं म्हणतो की, विश्वास हा नीतिमान ठरण्याच्या अगोदर येतो. तात्त्विक दृष्टिकोनातून पाहिलं, तर विश्वास नीतिमान ठरण्याच्या आधी असतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचं झालं, तर आपलं नीतिमान ठरणं हे विश्वासावर अवलंबून असतं आणि विश्वासाच्या आधारेच ठरतं, त्यामुळे नीतिमान ठरण्यासाठी विश्वास ही एक अग्रक्रमित अट, एक आवश्यक पूर्वमूलाधार आहे. म्हणजेच, विश्वास नीतिमान ठरण्यापूर्वी असावा लागतो, वेळेच्या क्रमाने नव्हे, तर तर्कशुद्ध अनिवार्यतेनुसार. म्हणून, जेव्हा आपण तारणाच्या क्रमावर चर्चा करतो, तेव्हा आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे की आपला उद्देश घटनांच्या कालक्रमाबद्दल बोलणं नाही, तर आपण तात्त्विकदृष्ट्या आवश्यक अटींच्या आधारे असलेल्या भेदांबद्दल बोलत असतो. रोमकरांस 8:28 मध्ये नवीन करारातील एक प्रसिद्ध आणि अत्यंत प्रिय वचन आहे: “परंतु आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांना म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांना देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात” (वचन 28). हे लक्षात घ्या की, ‘सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात’ हे अभिवचन सर्वांसाठी नाही; ते त्या विशिष्ट लोकांसाठी आहे जे देवावर प्रीती करतात आणि जे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेले आहेत.

हे पाचारण एक विशेष प्रकारचं पाचारण आहे. बायबलमध्ये अशा पाचारणाचाही उल्लेख आहे जे सर्वांसाठी आहे, ज्याला आपण बाह्य पाचारण (external call) म्हणतो. पण प्रत्येकजण ज्याला हे पाचारण दिले जाते, त्या प्रत्येकालाच



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 47 06-08-2025 23:20:06

तारणप्राप्त होत नाही. बायबल आणखी एका प्रकारच्या पाचारणाबद्दल बोलतं—जे अंतर्गत असतं. हे पाचारण माणसाच्या अंतरात्म्याशी संबंधित असतं. हे पाचारण देव पवित्र आत्म्याद्वारे करतो. आणि हेच पाचारण प्रभावोत्पादक असते. यामध्ये पवित्र आत्मा विश्वास ठेवणाऱ्यांच्या अंतःकरणाची दारे उघडतो आणि देवाच्या उद्देशानुसार कार्य करतो. पौल रोमकरांस 8:28 मध्ये याच प्रभावोत्पादक आणि आंतरिक पाचारणाचा उल्लेख करतो. निवडलेले सर्व लोक हे आंतरिक पाचारण अनुभवतात, हे पुढील वचनांतून अगदी स्पष्ट होतं.

आपण वचन 29 च्या पहिल्या भागाकडे लक्ष देऊ: "कारण ज्यांच्याविषयीचे त्याला पूर्वज्ञान होते त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे म्हणून त्याने त्यांना आगाऊच नेमून ठेवले; ह्यात हेतू हा की, तो पुष्कळ बंधुजनांमधला ज्येष्ठ असा व्हावा." येथे पौल तारणासंबंधी देवाच्या संकल्पाविषयी बोलतो, आणि आपल्या विवेचनाची सुरुवात देवाच्या पूर्वज्ञानापासून करतो. तो आम्हाला सांगतो की ज्यांच्याविषयीचे त्याला पूर्वज्ञान होते, त्याने त्यांना आगाऊच नेमून ठेवले. मग या नेमणुकीचा उद्देश काय होता? तो असा की, ज्यांना देवाने पूर्वज्ञानाच्या आधारे जाणिले, त्यांना ख्रिस्ताच्या प्रतिमेस अनुरूप असे बनवले जावे.

वचन 30 मध्ये आपण ज्या गोष्टीला 'तारणाची सुवर्ण साखळी' म्हणतो, त्याचं वर्णन आहे: "ज्यांना त्याने आगाऊ नेमून ठेवले त्यांना त्याने पाचारणही केले. ज्यांना त्याने पाचारण केले त्यांना त्याने नीतिमानही ठरवले; आणि ज्यांना त्याने नीतिमान ठरवले त्यांचा त्याने गौरवही केला." हे तारणाच्या क्रमाचं संक्षिप्त रूप आहे. तारणाच्या प्रक्रियेत आणखीही काही पैलू आहेत जे इथे नमूद केलेले नाहीत. रोमकरांस 8:30 हे वचन निवडक मुख्य बिंदूंवर प्रकाश टाकते. उदाहरणार्थ, पवित्रीकरण या यादीत नाही. मात्र, या यादीत पुढील क्रम समाविष्ट आहे : (29 वचनाच्या आधारे) प्रथम—पूर्वज्ञान; दुसरे—आगाऊ नेमणे; तिसरे—पाचारण; चौथे—नीतिमान ठरणे; आणि पाचवे—गौरव.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 48 06-08-2025 23:20:06

आपल्या तारणाच्या खातरीच्या निरीक्षणासाठी हे समजून घेणं अत्यंत आवश्यक आहे की या तारणाच्या क्रमामध्ये नेमकं काय घडतं आहे. मी पूर्वी नमूद केल्याप्रमाणे, पौल येथे एका तर्कसुसंगत क्रमाची मांडणी करतो, ज्याची सुरुवात पूर्वज्ञानाने होते. मी आधी ज्या पूर्वज्ञानाधारित निवडीच्या दृष्टिकोनाचा उल्लेख केला, तो लोकांमध्ये लोकप्रिय आहे, कारण लोक या शास्त्र पाठाकडे पाहतात आणि म्हणतात: “अहो! पहिलं पाऊल म्हणजे पूर्वज्ञान. म्हणजेच, निवड किंवा आगाऊ नेमणूक ही काहीतरी अशा गोष्टीवर आधारित आहे, जी देवाला लोकांबद्दल आधीच माहिती आहे.” पण हा शास्त्रपाठ तसं काही म्हणत नाही. प्रत्यक्षात, पौल रोमकरांस 9 मध्ये याचे अधिक विस्तृत विवेचन करतो आणि अशा शक्यतेला स्पष्टपणे नाकारतो. रिफॉर्म्ड (धर्मसुधारक) ) निवडीच्या शिक्षणानुसार, देवाच्या संकल्पानुसार निवडले गेलेले लोक कुठलेही निनावी, अस्पष्ट पात्र नाहीत. देव जेव्हा कोणाला निवडतो म्हणजे, त्याला हे ठाऊक असतं की तो कोणाची निवड करत आहे. म्हणून, पूर्वज्ञान हे नेहमीच आगाऊ नेमण्याच्या आधी असणे अगत्याचे आहे, कारण देव विशिष्ट व्यक्तींना नेमत असतो, म्हणजे ज्यांच्यावर तो प्रेम करतो, आणि ज्यांना तो निवडतो.

यानंतरचा तर्कसंगत टप्पा म्हणजे आगाऊ नेमणे (predestination). पौल म्हणतो की, ज्या लोकांविषयी देवाला पूर्वज्ञान होते, त्यांना त्याने आगाऊच नेमले. ही गोष्ट या वाक्यात स्पष्टपणे सांगितलेली नाही, पण वचनाच्या रचनेतून हे अगदी स्पष्टपणे समजते की, पूर्वज्ञानाच्या श्रेणीत जे कोणी आहेत, त्यांना देवाने आगाऊ नेमलेले आहे. खरं तर, देवाचं पूर्वज्ञान सर्व लोकांबाबत असतं, केवळ निवडलेल्यांपुरतंच नव्हे. पण येथे पौल ज्या पूर्वज्ञानाचा उल्लेख करत आहे, ते देवाच्या **निवडलेल्या** लोकांविषयी असलेले पूर्वज्ञान आहे. हे आपल्याला कसं समजतं? कारण पौल ठामपणे सांगतो की, ज्या लोकांविषयी देवाला या अर्थानं पूर्वज्ञान आहे, त्यांनाच तो आगाऊ नेमतो. आणि जे आगाऊ नेमले गेले आहेत,



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 49 06-08-2025 23:20:06

त्यांनाच तो पाचारण करतो; ज्यांना तो पाचारण करतो, त्यांना तो नीतिमानही ठरवतो. आणि हाच ठळक मुद्दा आहे—जर सर्व पाचारलेले लोक नीतिमान ठरत असतील, तर मग पौल नक्कीच केवळ बाह्य पाचारणाबद्दल बोलत नाही. तो आंतरिक पाचारणाबद्दल बोलत आहे, कारण हेच ते पाचारण आहे जे नक्कीच प्रभावी ठरतं—जे मिळाल्यावर मनुष्य नीतिमान ठरवला जातो. आणि जो नीतिमान ठरतो, त्याला मग गौरवही प्राप्त होतो.

यास्तव, जर मला हे जाणून घ्यायचं असेल की, मला शेवटी गौरव प्राप्त होणार आहे का—म्हणजे, माझं तारण शेवटी निश्चितपणे सिद्ध होणार आहे का—तर मला सर्वप्रथम हे तपासावं लागेल की मी नीतिमान ठरलो आहे का. जर मी नीतिमान ठरलो असेन, तर मला खातरी बाळगता येते की मला गौरवाची प्राप्ती होईलच. याचा अर्थ असा की, जर मी आज नीतिमान ठरलो असेन, तर मला भीती किंवा शंका बाळगण्याचं काहीच कारण नाही. कारण, ज्याने माझ्यामध्ये हे चांगलं काम सुरू केलं आहे, तोच ते शेवटपर्यंत—**येशू ख्रिस्ताच्या दिवसापर्यंत**—सिद्धीसही नेईल, असा मला भरवसा आहे (फिलिप्पै. 1:6).

## पाचारण आणि खातरी यांचा संबंध

पाचारणाचा आपल्या तारणाच्या खातरीशी नेमका काय संबंध आहे? याविषयी मी पुढील अध्यायात अधिक विस्तारपणे बोलणार आहे, पण सध्या एवढंच सांगतो की रोमकरांस 8:29–30 मध्ये पौल ज्या पाचारणाचा उल्लेख करतो, ते असे आहे की पवित्र आत्मा आपल्या आत्म्यावर कार्य करतो आणि आपल्याला विश्वास ठेवण्यासाठी व नीतिमान ठरविले जाण्यासाठी तयार करतो. जर आपल्याला खातरी आहे की आपल्याला हे पाचारण प्राप्त झालं आहे, तर मग आपण



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 50 06-08-2025 23:20:06

निवडलेलो आहोत, हेही आपल्याला ठाऊक असतं. पण प्रश्न असा उभा राहतो की आपल्याला हे पाचारण झालं आहे की नाही, हे आपल्याला कसं कळणार? याचं उत्तर पौल इफिसकरांस पत्र 2 मध्ये देतो:

> “तुम्ही आपले अपराध व आपली पातके ह्यांमुळे मृत झालेले होता; त्या पातकांमध्ये तुम्ही पूर्वी चालत होता, अर्थात ह्या जगाच्या रहाटीप्रमाणे अंतरिक्षातील राज्याचा अधिपती म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत आता कार्य करणाऱ्या आत्म्याचा अधिपती ह्याच्या धोरणाप्रमाणे चालत होता त्या लोकांत आपणही सर्व पूर्वी आपल्या दैहिक वासनांना अनुरूप असे वागलो, आपल्या देहाच्या व मनाच्या इच्छांप्रमाणे करत होतो व स्वभावतः इतरांप्रमाणे क्रोधाची प्रजा होतो तरी देव दयासंपन्न आहे म्हणून आपण आपल्या अपराधांमुळे मृत झालेले असताही त्याने आपल्यावरील स्वतःच्या अपरंपार प्रेमामुळे, ख्रिस्ताबरोबर आपल्याला जिवंत केले, (कृपेने तुमचे तारण झालेले आहे); व ख्रिस्त येशूच्या ठायी त्याच्याचबरोबर उठवले व त्याच्याचबरोबर स्वर्गात बसवले; ह्यासाठी की, ख्रिस्त येशूच्या ठायी त्याच्या तुमच्या-आमच्यावरील ममतेच्या द्वारे येणाऱ्या युगात त्याने आपल्या कृपेची अपार समृद्धी दाखवावी कारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झालेले आहे व हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे; कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही आपण सत्कृत्ये करावीत म्हणून ख्रिस्त येशूच्या ठायी निर्माण केलेले असे आपण त्याची हस्तकृती आहोत; ती सत्कृत्ये आचरत आपण आपला आयुष्यक्रम चालवावा म्हणून देवाने ती पूर्वी योजून ठेवली” (इफिसकरांस पत्र 2:1-10).

पौलाने येथे जो सारांश संक्षिप्तपणे मांडला आहे, त्यात तो पवित्र आत्म्याच्या त्या कार्यावर भर देतो ज्याद्वारे आपण “जिवंत” केले जातो — हे ते कार्य आहे



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 51 06-08-2025 23:20:06

जे आपण ईश्वरविज्ञानाच्या दृष्टिकोनातून नवीन जन्म किंवा पुन्हा जन्मणे म्हणून समजतो. येशूने निकदेमला सांगितले की, नवीन जन्म घेतल्याशिवाय कोणीही देवाचे राज्य पाहू शकत नाही, त्यात प्रवेश तर दूरच (योहान. 3:3, 5). हा नवीन जन्म म्हणजेच अंतःकरणात खोलवर कार्य करणाऱ्या त्या आंतरिक, कार्यक्षम पाचारणाशी निगडित असतो. म्हणून, जेव्हा आपण खातरीचा शोध घेतो, तेव्हा हे समजणं महत्त्वाचं आहे की आपण निवडलेल्यांमध्ये आहोत, कारण निवडलेले असल्यावाचून, पवित्र आत्म्याचं हे आंतरिक कार्य आपल्यामध्ये घडणं अशक्य आहे.

म्हणून, जे सर्व निवडलेले आहेत, त्यांना या जीवनात कधीतरी पवित्र आत्म्याद्वारे नव्याने जन्म दिला जातो. त्याचप्रमाणे, जे सर्व नव्याने जन्मलेले आहेत, ते निवडलेल्यांमध्येच गणले जातात. म्हणून, जर तुम्हाला तुमच्या नवीन जन्माची खातरी असेल, तर तुम्हाला तुमच्या निवडीचीही खातरी आहेच; आणि जर तुम्हाला तुमच्या निवडीची खातरी आहे, तर मग तुमच्या तारणाची खातरीसुद्धा असणे साहजिकच आहे.

म्हणूनच, नवीन जन्म म्हणजे नेमकं काय हे समजून घेणं अत्यंत महत्त्वाचं आहे. पवित्र आत्म्याच्या या कार्याच्या स्वरूपाबाबत ख्रिस्ती समाजात मोठा गोंधळ आहे. अमेरिकेत स्वतःला इव्हांजेलिकल (सुवार्तावादी) म्हणवणारे अनेक लोक याबाबतीत परस्परविरोधी समजुती बाळगून आहेत—जेव्हा पवित्र आत्मा एखाद्या व्यक्तीला आध्यात्मिक मृत्यूपासून काढून आध्यात्मिक जीवनात नवीन जन्म देतो, तेव्हा नेमकं काय घडतं याविषयी त्यांचे दृष्टिकोन विरोधाभासी आहेत. म्हणूनच, नवीन जन्माविषयी शुद्ध, स्पष्ट समज असणं हे आपल्या कृपास्थितीबद्दल आणि देवाशी असलेल्या नातेसंबंधाबद्दल संपूर्ण खातरी प्राप्त होण्यासाठी अत्यंत महत्त्वाचं आहे. म्हणूनच, अंतिम अध्यायात मी 'देव जो पवित्र आत्मा' हा आपल्या जीवनात जे कार्य



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 52 06-08-2025 23:20:06

करतो त्याकडे लक्ष्य घालणार आहे, कारण हेच कार्य खऱ्या तारणाच्या खातरीचा सर्वांत मूलभूत पाया आहे.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 53 06-08-2025 23:20:06

CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 54 06-08-2025 23:20:06

## प्रकरण 5

# तारणाच्या पूर्ण खातरीचे उगमस्थान

गॅलप आणि बर्ना ग्रुपसारख्या संस्थांनी वेळोवेळी घेतलेल्या सर्वेक्षणांमधून असे स्पष्ट झाले आहे की, कोट्यवधी अमेरिकन लोक स्वतःला "नव्याने जन्मलेले ख्रिस्ती" असल्याचे म्हणतात. पण दुर्दैवाने, यांपैकी अनेकांचा "नवीन जन्म" म्हणजे काय, याविषयीचा समज अत्यंत तोकडा आणि गोंधळलेला होता. जर तुम्ही त्यांना विचारले, तर ते म्हणतील, "नव्याने जन्मलेला ख्रिस्ती म्हणजे असा कोणीतरी ज्याने एखाद्या सुवार्तिक कार्यक्रमात ख्रिस्ताचा स्वीकार करण्याचा निर्णय घेतलेला असतो," किंवा, "नवीन जन्म म्हणजे, कोणी असा इसम ज्याने 'पाप्याची प्रार्थना' म्हटलेली असते." पण, अशा कृतींनी एखाद्या व्यक्तीला खरोखरच नवीन जन्म मिळालेला आहे का, हे सिद्ध होत नाही; कारण आपण आधीच पाहिलं आहे की,



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 55 06-08-2025 23:20:07

नव्याने जन्म न होता देखील एखादी व्यक्ती विश्वासाची अवास्तविक कबुली देऊ शकते.

नव्याने जन्म होणे म्हणजे देवाच्या पवित्र आत्म्याच्या अलौकिक कार्यामुळे अंतःकरणात झालेले आमूलाग्र परिवर्तन. हे वास्तव समजून घेणे आपल्या तारणाच्या खातरीसाठी अत्यंत मोलाचे आहे.

मागील प्रकरणात आपण इफिसकरांस पत्र 2 मध्ये पाहिले की, पवित्र आत्म्याद्वारे घडून येणाऱ्या नव्या जन्मपूर्वी आणि नंतरच्या जीवनात किती प्रचंड फरक आहे. नवीन जन्मापूर्वी, आपण "जगाच्या रहाटीप्रमाणे अंतरिक्षातील राज्याचा अधिपती म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत आता कार्य करणाऱ्या आत्म्याचा अधिपती ह्याच्या धोरणाप्रमाणे चालत होतो. त्या लोकांत आपणही सर्व पूर्वी आपल्या दैहिक वासनांना अनुरूप असे वागलो, आपल्या देहाच्या व मनाच्या इच्छांप्रमाणे करत होतो" (वचने 2–3a). हे त्या नवीन जन्म न झालेल्या पतित व्यक्तीच्या जीवनाचे वर्णन आहे. पण नवीन जन्मानंतर आपली ओळख बदलते, आता आपण "परके व उपरे नाही; पण पवित्र जनांच्या बरोबरीचे नागरिक व देवाच्या घरचे" आहोत" (वचन 19).

नव्याने जन्म होतो तेव्हा नेमकं काय घडतं? आत्म्याच्या कार्यामुळे आपल्या अंतःकरणात कोणता बदल घडतो? या प्रश्नावर वाद आहेत, कारण नव्या जन्माविषयीची समज हे अनेकदा मूळ पापाविषयीच्या समजुतीवर अवलंबून असते. विश्वासाची कबुली देणारे सर्वच ख्रिस्ती लोक मानतात की मनुष्य कोणत्या ना कोणत्या प्रकारे पापात पतन पावलेला आहे, आणि आपल्या आंतरिक प्रकृतीमध्ये काहीतरी दोष निर्माण झाला आहे. आम्हां सर्वांना माहीत आहे की आपण भ्रष्ट, पापमग्न असे मानव-प्राणी आहोत. मात्र, ही पतित अवस्था किती भीषण आहे — म्हणजेच नैतिक अध:पतनाचे स्वरूप — याविषयी प्रचंड मतभेद



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 56 06-08-2025 23:20:07

आहेत.

असे काही ख्रिस्ती लोक आहेत जे मान्य करतात की, होय, मानवाचे पतन झालेले आहे, तरी मनुष्याच्या आत्म्याच्या गाभ्यात—जरी तो आत्मा भ्रष्ट अवस्थेत असला—एक छोटंसं "नीतिमत्त्वाचं बेट" आहे जे अद्यापही निर्मळ आहे. या बेटावर उभं राहून, माणसाला त्याच्या नव्या जन्माआधीच देवाच्या कृपेच्या आमंत्रणाला सहकार्य करण्याची शक्ती अजूनही आहे, अशी कल्पना ते मांडतात. मात्र, शास्त्रात मला ही कल्पना कुठेच सापडत नाही. जेव्हा आपण आपल्या नैसर्गिक स्थितीविषयी शास्त्राचं शिक्षण पाहतो, तेव्हा आपल्याला असे शब्द आढळतात: "पापाच्या दास्यात" (रोम. 8:21), "अपराध व पापांमध्ये मृत" (इफिस. 2:1), व "क्रोधाची प्रजा" (रोम. 8:21). ऐतिहासिकदृष्ट्या, ख्रिस्ती मंडळींनी या विधानांचा अर्थ असा घेतला आहे की नवीन जन्म न झालेल्या मनुष्यामध्ये एक नैतिक वक्रता असते—देवविरुद्ध अशी एक प्रवृत्ती. शास्त्र आपल्याला सांगतं की, आपण स्वभावाने देवाचे वैरी आहों —आणि 'वैर' हा शब्द म्हणजे शत्रुत्वाने भारलेली वृत्ती. नवीन जन्म होण्याआधी आपण देवाच्या गोष्टींपासून दूर गेलेले असतो. आपल्या अंतःकरणात ख्रिस्ताविषयी खरी आणि वास्तविक प्रीति नसते; आपल्या अंतःकरणात देवाविषयी तिळमात्रही प्रेम नसते.

तर मग, आपण नव्याने जन्मलो आहोत हे कसे कळेल?

## तुम्ही येशूवर प्रेम करता का?

व्यावहारिक पातळीवर, जे लोक तारणाची खातरी मिळवण्यासाठी संघर्ष करत असलेले लोग असतात, ते अनेकदा माझ्याजवळ येतात आणि विचारतात, "माझे खरोखर तारण झाले आहे हे मला कसं कळेल?" अशांना उत्तर देताना मी त्यांना



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 57 06-08-2025 23:20:07

तीन प्रश्न विचारतो.

**प्रथम** मी विचारतो: "तुम्ही येशूवर पूर्ण प्रेम करता का?" मी हा प्रश्न ज्या प्रत्येक व्यक्तीला विचारला आहे, तिने नेहमी प्रामाणिकपणे उत्तर दिलं आहे: "नाही, मी त्याच्यावर प्रेम करत नाही." आणि म्हणूनच त्यांना त्यांच्या आत्म्याच्या स्थितीबद्दल खातरी नसते; त्यांना हे माहीत असतं की ख्रिस्ताविषयीच्या त्यांच्या प्रेमात उणिवा आहेत—कारण त्यांना हेही माहीत असतं की जर त्यांनी ख्रिस्तावर परिपूर्ण असं प्रेम केलं असतं, तर त्यांनी त्याच्या आज्ञाही परिपूर्ण अशा पाळल्या असत्या. येशूने म्हटले आहे, "जर तुमची माझ्यावर प्रीती असेल, तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल" (योहान. 14:15). म्हणून, आपण त्याच्या कोणत्याही आज्ञेचे उल्लंघन करतो तेव्हा, तो एक संकेत असतो—की आपण त्याच्यावर परिपूर्ण प्रीती करत नाही.

**दुसरे**, जेव्हा एखादी व्यक्ती कबूल करते की तिचं येशूवर परिपूर्ण प्रेम नाही, तेव्हा मी विचारतो: "तुम्ही त्याच्यावर जितके प्रेम केले पाहिजे तितके प्रेम करता का?" बहुतांश वेळा, समोरची व्यक्ती माझ्याकडे विचित्र नजरेने पाहते आणि म्हणते, "म्हटलं तर... नाही, अर्थातच मी तशी प्रीती करत नाही." आणि हेच बरोबर उत्तर आहे—कारण जर पहिल्या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असं असेल, तर दुसऱ्या प्रश्नाचं उत्तरही 'नाही' असंच असायला हवं. कारण आपण त्याच्यावर परिपूर्ण प्रेम करायला पाहिजे होतं, पण ते आपल्याला जमत नाही. आणि हाच तो आंतरिक तणाव आहे, जो आपल्याला आपल्या तारणाबद्दल चिंताग्रस्त करून टाकतो.

**तिसरे**, मी विचारतो, "बरं, तुझं येशूवर थोडं तरी प्रेम आहे का?" त्या व्यक्तीने उत्तर देण्यापूर्वी मी सहसा स्पष्ट करतो की, माझा प्रश्न पवित्र शास्त्रात प्रकट झालेल्या ख्रिस्ताविषयी आहे—बायबलामध्ये उलगडून दाखवलेल्या ख्रिस्तावरील प्रेमाबद्दल. मी हे स्पष्टपणे का सांगतो?

खूप वर्षांपूर्वी, मी कोलोरॅडो स्प्रिंग्स इथल्या यंग लाइफ इन्स्टिट्यूटमध्ये अध्यापन



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 58 06-08-2025 23:20:07

करत होतो. त्या काळात, यंग लाइफसाठी आणि यंग लाइफमध्ये, मी मोठ्या प्रमाणावर काम करत असे. जेव्हा मी तिथल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देत होतो, तेव्हा मी त्यांना स्पष्टपणे सांगायचो, "ही सेवा करताना एक मोठा धोका ओळखा—मला वैयक्तिकरित्या जगात कोणत्याही अन्य 'युथ-मिनिस्ट्री' विषयी माहिती नाही, जी यंग लाइफइतकी प्रभावी असेल—तरुणांपर्यंत पोहोचणे, त्यांच्या संघर्षांशी एकमन होणे, त्यांच्या दु:खांत समदुखी होणे, आणि त्यांनी प्रतिसाद द्यावा म्हणून तसे उत्तेजन देणे, यांबाबतीत. हीच या संस्थेची सर्वोच्च शक्ती आहे. पण तीच एक अत्यंत मोठी दुर्बळता देखील आहे. कारण यंग लाइफने ख्रिस्ती जीवनशैलीला इतकं आकर्षक करून ठेवलं आहे की, अनेक तरुण येशू ख्रिस्ताकडे वळण्याऐवजी 'यंग लाइफ' कडेच वळतात, आणि त्यातच समाधान मानतात.

अगदी त्याचप्रमाणे, अनेकदा असंही घडतं की एखादी व्यक्ती खऱ्या येशूपेक्षा त्याच्या काल्पनिक प्रतिमेवर प्रेम करत असते. म्हणूनच, जेव्हा मी लोकांना विचारतो, "तुमचं येशूवर खरंच प्रेम आहे का?", तेव्हा मी विचारत असतो की त्यांना 'बायबलामधील ख्रिस्त' प्रिय आहे का—तो ख्रिस्त जो केवळ लहान मुलांचा "सुपरहीरो" नाही, किंवा नैतिकतेचा एक आदर्श शिक्षक नाही, तर तो ख्रिस्त जो परमेश्वराच्या वचनात प्रकट झालेला आहे.

आता, जर कोणी त्या तिसऱ्या प्रश्नाला "होय" असं उत्तर दिलं, तर इथेच शुद्ध ईश्वरविज्ञानाची भूमिका सुरू होते. विचार करा: "नवीन जन्म न झालेल्या व्यक्तीला ख्रिस्ताबद्दल खरं प्रेम असणं शक्य आहे का?" माझं उत्तर आहे—नाही. कारण ख्रिस्ताबद्दलची ओढ ही मानव-अंत:करणात पवित्र आत्म्याच्या कार्याचा परिणाम असते. हेच तर नवीन जन्माचं स्वरूप आहे—पवित्र आत्मा ज्या कृतीने आमच्या निर्जीव आत्म्यांना जिवंत करतो. पवित्र आत्मा आमच्या आत्म्याचा मूळ स्वभावच बदलून टाकतो, आणि अंतःकरणाचा कल वळवतो. नव्या जन्माआधी, आपण देवाच्या गोष्टींविषयी थंड, शत्रुत्वाने भारलेले किंवा उदासीन असतो—आणि



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 59 06-08-2025 23:20:07

ही उदासीनताही एक प्रकारचं शत्रुत्वच आहे. आपल्यात देवाविषयी कोणतंही प्रामाणिक प्रेम नसतं, कारण आपण अजूनही देहस्वभावानुसारी असतो—आणि देहस्वभाव कधीही देवाच्या गोष्टींवर प्रेम करत नाही. देवावरचं खरं प्रेम केवळ पवित्र आत्म्याच्या नवीन जन्म देणाऱ्या सामर्थ्यानेच निर्माण होते—तो आत्मा जो आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव करतो (रोम. 5:5).

म्हणूनच, जर एखादा मनुष्य तिसऱ्या प्रश्नाला "होय" असं उत्तर देऊ शकत असेल, जरी त्याचं ख्रिस्तावरचं प्रेम अपूर्ण, किंवा जितकं असावं तितकं नसलं, तरीही मला खातरी वाटते की त्याच्या अंतकरणात हा बदल आत्म्याने घडवून आणला आहे, कारण आपल्या देह स्वभावात खऱ्या अर्थाने येशू ख्रिस्ताबद्दल प्रेम निर्माण करण्याचे सामर्थ्य नाही.

## नवीन जन्माचा चुकीचा दृष्टिकोन

नवीन जन्माविषयी काही दृष्टिकोन असे आहेत, जे मनुष्याला तारणाच्या खऱ्या खातरीपर्यंत घेऊन जात नाहीत. सध्याच्या सुवार्तावादी जगात प्रचलित असलेल्या दृष्टिकोनांपैकी एक म्हणजे हा की, नवीन जन्माच्या वेळी पवित्र आत्मा केवळ तुमच्या जीवनात प्रवेश करतो, तो तुमच्यात वास करतो. परंतु या दृष्टिकोनानुसार, नवीन जन्मानंतरही तुम्हाला स्वतःहून स्वेच्छेने आत्म्याला प्रतिसाद द्यावा लागतो, त्याच्याशी सहकार्य करावे लागते आणि तुमच्या जीवनाची सूत्रे त्याच्याकडे सुपूर्द करावी लागतात, कारण असे मानले जाते की, एखादा गृहस्थ नवीन जन्म घेतलेला असूनही, पवित्र आत्मा त्याच्यात वास करत असूनही, त्याच्यामध्ये आज्ञाधारकतेची फळे उमटतीलच असे नाही. त्यामुळेच, ते असेही म्हणतात की, एखादा तारलेला मनुष्य "दैहिक किंवा जगिक ख्रिस्ती" असू शकतो.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 60 06-08-2025 23:20:07

नवीन करारात 'दैहिक' हा शब्द वापरला जातो तेव्हा त्याचा अर्थ असा की, सुरुवातीस आपण पूर्णपणे ऐहिक असतो. आपण देहस्वभावात असताना, पवित्र आत्मा आपल्या अंतःकरणाचा कल आणि प्रवृत्ती बदलतो. तो ताबडतोब आमची दैहिक वृत्ती नष्ट करतो असे नाही; कारण ऐहिकपणा हा ख्रिस्ती म्हणून आमच्या आयुष्यभर आत्म्याशी संघर्ष करत राहते. गलतीकरांस 5:17 मध्ये म्हटले आहे त्याप्रमाणे, आत्मा आणि देह यांच्यात नेहमी संघर्ष सुरु असतो. यात शंका नाही. पण काही लोक "ऐहिक ख्रिस्ती" हा शब्द अशा व्यक्तीला संबोधण्यासाठी वापरतात, जी पवित्र आत्म्याच्या उपस्थितीमुळेही अंतःकरणात काहीच परिवर्तन अनुभवत नाही. या अर्थाने जर हा शब्द वापरला गेला, तर तो ख्रिस्ती व्यक्तीस नव्हे, तर अशा एका व्यक्तीस लागू होतो जिचा नवीन जन्मच झाला नाही.

म्हणून मी नवीन जन्माच्या या दृष्टिकोनाला मुळातच नाकारतो, कारण यात खरा नवीन जन्मच गृहीत धरलेला नाही. कारण जरी असं मानलं जातं की पवित्र आत्मा व्यक्तीच्या जीवनात प्रवेश करतो, तरीही तो आत्मा अशा कृपेचं अलौकिक कार्य करत नाही, जे आत्म्याच्या दिशेत व प्रवृत्तीत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणतो. ही व्यक्ती आत्मा येण्यापूर्वी जशी होती तशीच राहते. हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे की, नवीन जन्म म्हणजे पवित्र आत्म्याचे असे कार्य, जे खऱ्या अर्थाने व्यक्तीला बदलते; तिच्या आत्म्याचा गाभाच बदलून जातो. जर एखादी व्यक्ती खऱ्या अर्थाने नव्याने जन्मलेली असेल आणि तिच्यात विश्वासाची अभिव्यक्ती असेल, तर तिच्यात काही प्रमाणात आज्ञाधारकतेचे फळ प्रकट होणारच.

## आत्म्याचा 'विसार'

आपण याआधी पाहिले की, नवीन जन्म हे पवित्र आत्म्याचे कार्य आहे ज्याद्वारे



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 61 06-08-2025 23:20:07

आत्म्याचा मूळ कल बदलून टाकला जातो. परंतु, पवित्र आत्मा फक्त हेच कार्य करत नाही. तारणाच्या खातरीसाठी अत्यंत आवश्यक ठरणारी आणखी एक गोष्ट तो आपल्या जीवनात घडवतो. 2 करिंथकरांस 5:1-5 मध्ये असे लिहिले आहे :

> "कारण आम्हांला ठाऊक आहे की, आमचे पृथ्वीवरील मंडपरूपी गृह मोडून टाकण्यात आले, तर देवाने आमच्यासाठी सिद्ध करून ठेवलेले आमचे निवासस्थान स्वर्गात आहे; ते हातांनी बांधलेले गृह नसून सार्वकालिक आहे. ह्या गृहात असताना आम्ही स्वर्गीय गृहरूप वस्त्र परिधान करण्याच्या उत्कंठेने कण्हतो; आम्ही अशा प्रकारे वस्त्र परिधान केलेले असलो म्हणजे आम्ही उघडे सापडणार नाही कारण जे आम्ही ह्या मंडपात आहोत ते आम्ही भाराक्रांत होऊन कण्हतो; वस्त्र काढून टाकावे अशी आमची इच्छा आहे असे नाही, तर ते परिधान करावे अशी इच्छा बाळगतो; ह्यासाठी की, जे मर्त्य आहे ते जीवनाच्या योगे ग्रासले जावे; ज्याने आम्हांला ह्याकरताच सिद्ध केले तो देव आहे; त्याने आपला आत्मा आम्हांला विसार म्हणून दिला आहे" 2 करिंथ. 5:1-5

बायबलच्या इतर अनुवादांमध्ये 'विसार' या शब्दाचा अर्थ 'प्रतिज्ञा' किंवा 'हमी' असा दिला जातो. या शब्दाचा उगम प्राचीन ग्रीक व्यापारव्यवहाराच्या संज्ञा-संपदेतून झाला आहे. आजच्या काळात "विसार" (earnest) हा शब्द सर्वसामान्यपणे जमीन खरेदी विक्रीच्या व्यवहारात ऐकायला मिळतो (भारतात संपत्ती खरेदी-विक्रीच्या व्यवहारात याला M.O.U. असे म्हटले जाते). जसे की, एखाद्याला घर खरेदी करायचे असल्यास, तो सुरुवातीचा करार करतो, ज्यायोगे विक्रेता ते घर बाजारातून काढून घेतो. त्यावेळी विक्रेता त्या खरेदीदाराकडून 'earnest money' म्हणजेच 'विसार' मागतो, जेणेकरून हे स्पष्ट व्हावे की खरेदीदार ही गोष्ट गांभीर्याने घेत आहे. विक्रेत्याला अशाच लोकांशी व्यवहार करायचा असतो,



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 62 06-08-2025 23:20:07

जे खरोखरच तत्पर व निश्चयी असतात. या अर्थाने पाहता, 2 करिंथ. 5:5 मध्ये पवित्र आत्म्याला जो 'विसार' म्हणून दिला आहे, तो एक प्रतीकात्मक आश्वासक हमी आहे. जेव्हा पवित्र आत्मा आपल्याला नव्या सृष्टीच्या जीवनात प्रवेश देतो, तेव्हा तो केवळ आपल्या अंतःकरणाचा कल बदलत नाही, तर पूर्ण आणि अंतिम तारणाचे एक हमीपत्र म्हणून आपल्यात वासही करतो. ह्या 'विसारामुळे' आपण खातरीनिशी म्हणू शकतो की, देवाचे कार्य केवळ सुरूच झालेले नाही, तर ते निश्चितपणे पूर्णही होईल.

जेव्हा मी ठराविक कालावधीत एखादी वस्तू खरेदी करतो, तेव्हा मला त्यासाठी आगाऊ रक्कम—विसार—द्यावी लागते. हे आपल्याला माहीत आहे की अनेक वेळा लोक करार करतात, काही हप्ते भरतात, आणि नंतर मध्यावरच माघार घेतात. अनेकदा अशा व्यक्तींचे घर लिलावासाठी निघते, त्यांची गाडी जप्त केली जाते, कारण त्यांनी करारातील अटी पाळलेल्या नसतात. विसार म्हणजे संपूर्ण रक्कम देण्याचे आश्वासन. पण सर्वसामान्य माणसे हे वचन पूर्णपणे पार पाडतीलच असे नाही. परंतु, जेव्हा देव विसार देतो, तेव्हा तो विसार म्हणजे त्याचे स्वतःचे वचन असते—एक अलिखित पण अचूक अभिवचन. त्याच्या विसाराचा अर्थ असा की, तो उर्वरित रक्कम देखील नक्की देईल. पौल हीच भाषा वापरतो—जेव्हा तो म्हणतो की आपण पवित्र आत्म्यापासून जन्म घेतो, तेव्हा आत्मा केवळ आपली अंतःकरणे, आपली आत्मिक प्रवृत्ती वा आपली इच्छाशक्तीच परिवर्तित करत नाही, तर तो आपल्याला एक अभिवचन देतो—एक दृढ खातरी—की आपल्या तारणाची परिपूर्णता अनुभवास येणार आहे.

लोक या गंभीर सत्याकडे सहज दुर्लक्ष करतात, जेव्हा ते म्हणतात, "ठीक आहे, मी आज तारलेला आहे, परंतु उद्या मी माझे तारण गमावू शकतो." अशी विधाने करतांना, 'बायबल-सत्य' नाकारले जाते—की देव जे आरंभ करतो, ते तो पूर्णत्वासही नेतो. जेव्हा देव विसार देतो, तेव्हा तो संपूर्ण रक्कम पूर्णपणे फेडतो.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 63 06-08-2025 23:20:07

हीच गोष्ट आपल्या तारणाच्या खातरीचा एक अजोड आणि मजबूत पाया ठरते.

## भूपती देवाचा शिक्कामोर्तब

या वेळी 2 करिंथकरांस पत्र 1 मधून आणखी एक उदाहरण घेऊ:

> 'असा भरवसा बाळगून तुम्हांला दोनदा कृपादान मिळावे म्हणून पहिल्याने तुमच्याकडे यावे, तुमच्याकडून मासेदोनियास जावे, नंतर पुन्हा मासेदोनियाहून तुमच्याकडे यावे, व तुम्ही मला यहूदीयाकडे वाटेस लावावे, असा माझा बेत होता तर असा बेत असता मी चंचलपणा केला काय? अथवा मला होय होय, नाही नाही, अशी धरसोड करता यावी म्हणून जे मी योजतो ते देहस्वभावाप्रमाणे योजतो काय? देव विश्वसनीय आहे आमचे तुमच्याबरोबरचे बोलणे, 'होय', 'नाही' असे नाही. कारण देवाचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याची घोषणा आमच्याकडून म्हणजे मी, सिल्वान व तीमथ्य ह्यांच्याकडून तुमच्यामध्ये झाली ती होय, नाही, अशी नव्हती, तर त्याच्या ठायी होय अशीच होती देवाची वचने कितीही असोत, त्याच्या ठायी होय हे आहे; म्हणून आम्ही देवाच्या गौरवाला त्याच्या द्वारे आमेन म्हणतो ' (2 करिंथ. 1:15-20).

पौल येथे नेमके काय सांगतो? तो अगदी स्पष्टपणे हे प्रतिपादन करतो की परमेश्वर आपल्या अभिवचनांविषयी भ्रामक किंवा चंचल नाही. तो कधी 'होय', तर कधी 'नाही' असे गोंधळ निर्माण करणारे शब्द बोलत नाही. प्रेषित आपल्याला सांगतो, त्याची सर्व अभिवचने त्याच्या विश्वासू स्वभावगुणामुळे दृढ आणि अमोघ आहेत.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 64 06-08-2025 23:20:07

मग पौल पुढे म्हणतो, “आता, जो आम्हास अभिषेक करून तुमच्याबरोबर ख्रिस्तात सुस्थिर करीत आहे तो देव आहे. तसाच त्याने आपल्यावर शिक्का मारला आहे आणि जो येणार आहे त्याबद्दलची खातरी म्हणून आमच्या अंतःकरणात आपला पवित्र आत्मा हा विसार दिला आहे” (2 करिंथ. 1:21-22). येथे पुन्हा एकदा आत्म्याच्या खातरीचा उल्लेख आलेला आहे. परंतु केवळ खातरी किंवा विसार एवढ्यापुरतेच नव्हे, तर पौल आपल्याला सांगतो—आणि नंतर इफिसकरांना लिहिताना तो हे पुन्हा अधोरेखित करतो— आपल्याला पवित्र आत्म्याने शिक्कामोर्तब केले गेले आहे. “शिक्का” या संकल्पनेसाठी जो ग्रीक भाषेतील शब्द आहे तो म्हणजे **स्फ्रागिस**.

कदाचित तुम्ही मध्ययुगीन काळावर आधारित चित्रपट पाहिले असतील, ज्यांत सम्राटांचे विविध शिष्टाचार आणि चालीरीती दाखवलेले असतात. जेव्हा एखाद्या गावात राजाचे फर्मान प्रसिद्धीसाठी पाठवले जाई, तेव्हा त्या आदेशपत्रावर मेणाचा शिक्का उमटवला जात असे. हा शिक्का म्हणजेच त्या राजाचे अधिकृत चिन्ह असे, आणि ते चिन्ह त्याच्या स्वाक्षरीच्या अंगठीवर आधारित असे. त्या अंगठीच्या आत एक विशिष्ट रचना कोरलेली असे, जिच्यात राजाची स्वाक्षरी किंवा सम्प्रभुता प्रतिबिंबित असायची. म्हणून, जर एखाद्या दस्तऐवजावर, जाहीरनाम्यावर किंवा आज्ञापत्रावर राजाच्या अंगठीतील मेणाचा शिक्का उमटलेला असेल, तर तो त्या दस्तऐवजाच्या अस्सलतेचा निखालस पुरावा मानला जाई. पौल 2 करिंथकरांस लिहिताना आपल्याला सांगतो की, विश्वाचा सम्राट आपल्या प्रत्येक लोकांच्या आत्म्यावर स्वतःचे नाश न होणारे चिन्ह उमटवतो. तो आपल्याला केवळ दृढ अशी खातरी देत नाही, तर तारणाच्या दिवसासाठी तो आपल्यावर शिक्का देखील मारतो—शाश्वत आणि अमोघ असा शिक्का.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 65 06-08-2025 23:20:07

## अंत:करणात पवित्र आत्म्याची साक्ष

शेवटी, रोमकरांस पत्र 8 मध्ये, आम्ही हे प्रोत्साहन देणारे शब्द वाचतो:

> ‘कारण जितक्यांना देवाचा आत्मा चालवत आहे तितके देवाचे पुत्र आहेत कारण पुन्हा भीती बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला नाही; तर ज्याच्या योगे आपण “अब्बा! बापा!” अशी हाक मारतो असा दत्तकपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला आहे तो आत्मा स्वत: आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की, आपण देवाची मुले आहोत; व जर मुले आहोत तर वारसही आहोत, म्हणजे देवाचे वारस, ख्रिस्ताबरोबर सोबतीचे वारस असे आहोत; आपल्याला त्याच्याबरोबर गौरव प्राप्त व्हावा म्हणून त्याच्याबरोबर जर दु:ख भोगत असलो तरच‘ (रोमकरांस पत्र 8:14-17).

आपले जीवन आणि अंतःकरण, आत्म्याचे फल (गलती. 5:22–24), आणि आपल्या जीवनात झालेल्या परिवर्तनाचे मोजमाप आपण अभ्यासताना, आपल्या आत आणि आपल्याद्वारे काय घडते आहे याचे मूल्यमापन अत्यंत प्रामाणिकपणे करणे आपल्याला आवश्यक असते. पण अखेरीस, आपल्या तारणाच्या खातरीचा खरा पाया हा आमच्या अंत:करणात पवित्र आत्म्याच्या साक्षेवर अवलंबून असतो, कारण तो आत्मा स्वत: आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की, आपण देवाची मुले आहोत.

मग, हे कसे ओळखावे की ही अंतःकरणातील साक्ष पवित्र आत्म्याकडूनच आहे, एखाद्या दुष्ट आत्म्याकडून नाही? पवित्र आत्मा आपल्याला हे कसे पटवून देतो की आपण खरोखर देवाची लेकरें आहोत? आत्मा आपल्या आत्म्याबरोबर वचनाच्या माध्यमातून साक्ष देतो. आपण वचनापासून जितके दूर जातो, तितकीच



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 66 06-08-2025 23:20:07

या जीवनात खातरीची अनुभूती कमी होते. परंतु आपण देवाच्या वचनात जितके खोल जातो, तितकाच तो आत्मा — ज्याच्या प्रेरणेने संदेष्ट्यांनी वचन बोलून ते लिहिलेही आणि जो आपल्यासाठी त्याचा अर्थ प्रकाशित करतो — तो स्वतः वचनाच्या द्वारे आपल्या आत्म्यात ही खातरी दृढ करतो की आपण खरोखरच त्याचे आहोत, त्याच्या संततीतलेच एक आहोत.



CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 67 06-08-2025 23:20:07

**लिग्निएर** लायब्ररी

लिगोनियर मिनिस्ट्रीज ही एक आंतरराष्ट्रीय ख्रिस्ती शिष्यत्व संस्था आहे, जी डॉ. आर. सी. स्प्रौल यांनी १९७१ मध्ये स्थापन केली. तिचे ध्येय म्हणजे देवाच्या पवित्रतेचे संपूर्णत्व जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवणे, शिकवणे आणि त्याचे समर्थन करणे होय. लिगोनियर लायब्ररीचे चिन्ह जगभरात आणि अनेक भाषांमध्ये विश्वासार्हतेचे प्रतीक म्हणून ओळखले जाते.

महाआज्ञेच्या प्रेरणेने, लिगोनियर जगभरातील लोकांना मुद्रित आणि डिजिटल स्वरूपात शिष्यत्व साधने उपलब्ध करून देते. विश्वासार्ह पुस्तके, लेख आणि व्हिडिओ शिक्षण मालिका पन्नासपेक्षा अधिक भाषांमध्ये भाषांतरित किंवा डब केल्या जात आहेत. आमची इच्छा म्हणजे येशू ख्रिस्ताच्या मंडळीला आधार देणे, जेणेकरून ख्रिस्ती लोकांना ते काय मानतात, का मानतात, ते कसे जगावे आणि ते इतरांपर्यंत कसे पोहोचवावे हे समजावे.

MR.LIGONIER.ORG

CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 68 06-08-2025 23:20:07

## लेखक परिचय

**डॉ. आर. सी. स्प्रॉल** हे लिगोनिअर मिनिस्ट्रीज या सेवाकार्याचे संस्थापक होते. ते सेंट अँड्रूज चॅपेल (सॅनफर्ड, फ्लोरिडा) येथे प्रचार आणि शिक्षण विभागाचे प्रमुख सेवक होते. रिफॉर्मेशन बायबल कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष आणि टेबलटॉक मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून त्यांनी सेवा बजावली. त्यांचा रेडिओ कार्यक्रम रिन्यूइंग युवर माईंड आजही जगभरातील शेकडो रेडिओ स्टेशन्सवर दररोज प्रसारित होतो, तसेच ऑनलाईन स्वरूपातही ऐकता येतो. ते शंभराहून अधिक पुस्तकांचे लेखक होते, ज्यात *The Holiness of God, Chosen by God,* आणि *Everyone's a Theologian* हे विशेष प्रसिद्ध आहेत. पवित्रशास्त्राच्या अखंड, अचूकपण आणि दैवी प्रेरितत्वेबद्दल त्यांनी अत्यंत स्पष्ट, विचारप्रवण आणि सुसंगत भूमिका घेतली. देवाच्या वचनावर दृढपणे उभे राहाणे हे देवाच्या लोकांचे आध्यात्मिक कर्तव्य आहे, ही निकड त्यांनी जागतिक स्तरावर प्रभावीपणे मांडली.

----------------------------------------

CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 69 06-08-2025 23:20:07

# मला तारणाची खरी खातरी कशी मिळेल?

आज मंडळीतील अनेक लोक तारणाविषयीच्या शंका आणि संभ्रम याने व्याकूळ झालेले आहेत. मात्र, ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांनी आपल्या तारणाची ठाम खातरी बाळगणे हे केवळ शक्यच नाही, तर पवित्रशास्त्र त्यांना आपले पाचारण व निवड ही देखील दृढ करावी अशी आज्ञा देते (2 पेत्र 1:10).

या लघुपुस्तिकेत डॉ. आर. सी. स्प्रॉल विश्वासणाऱ्यांना याच उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी मार्गदर्शन करतात. सुबोध आणि थोडक्याच प्रकरणांद्वारे ते तारणाची खातरी म्हणजे काय, ती कशी प्राप्त करता येते, तिच्यामुळे मिळणारे आशीर्वाद कोणते, यांचे स्पष्टीकरण देतात आणि खोट्या खातरीमुळे उद्भवणाऱ्या भयानक परिणामांविषयी सावध करतात.

डॉ. आर. सी. स्प्रॉल यांची क्रूशियल क्वेश्चन्स ही लघुपुस्तक-मालिका, ख्रिस्ती विश्वासणारा आणि विचारशील शोधक यांनी वारंवार विचारणाऱ्या गंभीर प्रश्नांची संक्षिप्त पण आशयघन उत्तरे देण्याचा प्रयत्न करते.

**डॉ. आर. सी. स्प्रॉल** हे लिगोनियर मिनिस्ट्रीजचे संस्थापक होते, सॅनफोर्ड, फ्लोरिडामधील सेंट अँड्र्यूज चॅपेलमधील प्रचार व शिक्षण यांचे मुख्य पाळक होते, आणि रिफॉर्मेशन बायबल कॉलेजचे प्रथम अध्यक्ष होते. त्यांनी The Holiness of God या प्रसिद्ध ग्रंथासह शंभरहून अधिक पुस्तकांचे लेखन केले आहे.

लिग्निएर लायब्ररी

CAN I BE SURE_Book Layout_FINAL 7.8.2025.indd 70 06-08-2025 23:20:07